MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष अठरावे / अंक ११ / नोव्हेंबर २०१७

## संपादकीय

### विविधतेतील एकता?

मुंबईच्या एल्फिन्स्टन पुलावरील दुर्घटना, नदीजोड प्रकल्पातील बोगद्यातील दुर्घटना, रस्त्यावर टँकर उलटून होणारी वायूगळती, विद्यापीठातील प्रश्नपत्रिका फुटणे, रेल्वेचे वाढत जाणारे अपघात या सगळ्या अपघातांमुळे मालमत्तेची तर हानी होतच असते, पण मोठ्या प्रमाणावर निरपराध नागरिकांचाही त्यामध्ये बळी जात असतो. आपल्या कर्तव्यांचे आपण जबाबदारी पूर्वक पालन केले तर असले अपघात टाळता येऊ शकतात. अशा अनेक अपघाती गोष्टींची यादी आपण दररोज वाचत असतो. या गोष्टी वेगवेगळ्या ठिकाणी घडत असल्या, तरीही त्या सगळ्यांमध्ये कुठे तरी 'मानवी' घटक जबाबदार आहेत. हा मानवी घटक म्हणजे जबाबदारीच्या 'जाणिवे'चा अभाव. आपल्या प्रत्येक कृतीतन जशी स्वतः करता एक व्यवस्था निर्माण होत असते, तशीच आपण ज्या समाजाचे घटक असतो त्या समाजव्यवस्थेतही त्याचे तरंग उमटत असतात. स्वतः पुरते होणारे बदल आपण वैयक्तिक फायद्या-तोट्याच्या भाषेत मोजतो व ते आपल्या तत्काळ लक्षात येतात, पण आपल्या कृतीमुळे समाजव्यवस्थेवर होणारे बदल हे अनेक वेळा 'दृश्य' नसतात, किंवा त्यांची तिव्रता काही काळानंतर लक्षात येते.

'व्यक्ती तितक्या प्रकृती' असं आपण नेहमीच म्हणतो, किंवा टाळ्या मिळवायच्या असतील तर 'विविधतेतून एकता' असेही म्हणतो. 'विविधतेतून एकता' याचा संदर्भ बहुतांशी राजकीय समिकरणांशीच जोडलेला असतो. 'विविधतेतून एकते' प्रमाणेच 'वसुधैव कुटुंबकम्' हेही असेच एक वचन राजकारण्यांनी बोथट करून टाकले आहे. प्रत्येक व्यक्ती जर का 'भिन्न' आहे तर या भिन्नतेतून 'एकता' आणायची म्हणजे काय? भिन्नता व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य घटक जर का धरला, तर एकता ही जवळजवळ अशक्य आहे. व्यक्तिच्या या 'भिन्नतेला' नाकारणं म्हणजे 'एकता' स्विकारणं नाही. व्यक्ती म्हणजे प्रत्येक मानव असं गृहीत धरलं, तरी मानवामध्ये 'स्त्री' व 'पुरुष' असे भेद असतात. त्यांच्यामधील या मूलभूत नैसर्गिक फरकामुळे त्यांच्या विचारशैली ते कार्यशैलीपर्यंत फरक असू शकतो. त्याचप्रमाणे प्रत्येक मनुष्य हा जन्मापासून मृत्यूपर्यंत वेगवेगळ्या टप्प्यावर उभा असतो. आपल्या या कालखंडातील त्याच्या अनुभवामुळे त्याच्या संवेदना विकसित झालेल्या असतात. या संवेदना व अनुभवावरती, स्वतःकडे व जीवनाकडे पाहण्याचा त्याचा दृष्टीकोनही भिन्न असू शकतो. जीवनातील वरकरणी दिसणारा एखादा अनुभवसुद्धा दोन व्यक्तींसाठी वेगळे संदेश देतो. या सगळ्या संवेदना या शेवटी वैयक्तिक जीवनाप्रमाणे सामाजिक

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय)**

जीवनाशी जोडलेल्या असतात. यातूनच आचार-विचारांची विविधता निर्माण होत असते. तिचा आदर करायलाच हवा. ही विविधता एकमेकांच्या विरोधात असते असे मानण्याची गरज नाही.

मनुष्य जेव्हा सुसंस्कृत व्हायला लागला, तेंव्हा त्याच्या जगण्याकरता तो वेगवेगळ्या सामाजिक व्यवस्था निर्माण करू लागला. 'कुटुंब', 'लग्न' हा अशा व्यवस्थांचाच एक भाग आहे. यातूनच नातीगोती निर्माण व्हायला लागतात. थोडक्यात, एखादं बालक जन्माला येतं तेंव्हा ते शिशु असतं, वयात येतं तेंव्हा ते तरुण होतं व लग्नानंतर गृहस्थी होते. म्हणजे आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावरती, 'सामाजिक' व 'सांस्कृतिक' व्यवस्थेनुसार जबाबदाऱ्या बदलतात, व त्यातून या भिन्नतेत वाढ होते. प्रत्येक समाजव्यवस्थेत या विविधतेतून सुसूत्र, संतुलित व जास्तीत जास्त व्यक्तीगत व सामाजिक फायदा मिळवण्याकरता एक व्यवस्था निर्माण केलेली असते. याच व्यवस्थेला पुढे अभ्यासक 'सभ्यता' किंवा 'संस्कृती' असे म्हणतात.

दुर्दैवाने असा एक सार्वत्रिक गैरसमज आहे की, मानवी इतिहासाच्या कालक्रमणामध्ये आधीच्या सभ्यता या 'बाल्या'वस्थेत होत्या. मानवी आयुष्याच्या (Anthropomorphic) कालखंडाच्या संकल्पनांचं रोपण हे सभ्यतांच्या कालखंडांवरती करण्यात येते. मानवाच्या आयुष्यातील बाल्यावस्था, तारुण्य आणि वृद्धत्व या नैसर्गिक अवस्था आहेत. प्रत्येक अवस्थेतून मार्गक्रमण करताना त्याच्या अनुभवांच्या संचितामुळे तो निर्णय घेण्याकरता सक्षम होत असतो. बाल्यावस्थेतील 'तर्क', 'विवेक' आणि तारुण्यातील 'तर्क' व 'विवेक' वेगळा असतो. साहजिकच विस्तवाला मुलाचा जेव्हा प्रत्यक्ष हात लागतो, तेव्हा त्याला कळतं की विस्तवाला हात लावायचा नसतो. थोडक्यात; बालकाची तर्क व विवेकक्षमता, निर्णयक्षमता कमी दर्जाची असते. याच विचाराचे रोपण जेव्हा सभ्यतांचं वर्गीकरण करताना, 'बाल्या'वस्था म्हणून केली जाते, तेव्हा त्या सभ्यता सर्वार्थाने अविकसित व मागासलेल्या होत्या असा निष्कर्ष निघतो. असे सोपे निष्कर्ष त्या सभ्यतांमधील जाणिवा, त्यांच्या सामाजिक व्यवस्था, आणि संस्कृतीचा अभ्यास करण्याकरता लागणाऱ्या तटस्थतेला सुरुंग लावतात. पाश्चात्य संशोधन व्यवस्थेच्या गृहितांचा आंधळा अनुनय आपण चालू ठेवला आहे.

सामाजिक, किंवा सांस्कृतिक संशोधनाचा त्यांचा संदर्भ हा 'पाश्चात्य' संस्कृतीचा होता. त्यांचा समाजविकास किंवा सांस्कृतिक मूल्यांची निर्मिती ही संपूर्णतः भिन्न होती. त्याला औद्योगिक क्रांतीचीही पार्श्वभूमी होती. अनेक पाश्चात्य अभ्यासकांना याची जाणीव झालेली दिसते. आपल्याकडचे संशोधक, कथा, कादंबरीकार मात्र अजून न झालेल्या अन्यायाच्या नवीन, नवीन कल्पना शोधून त्याच चिवडण्यात मग्न आहेत. यातच भाषा आणि अस्मितेची फोडणी मिळाली की 'एकता' आणि 'विविधता' दोघांचाही विदूषक होतो. शिल्लक राहते ती फक्त राजकीय घोषणा 'विविधतेतून एकता'.

हाच गोंधळ 'अधिकार' आणि 'स्वातंत्र्य' या संकल्पनांचा. जबाबदारीशून्य अधिकार, किंवा स्वातंत्र्य म्हणजे अराजकता. राजकारण्यांनी अधिकाराचे परिवर्तन 'सत्ता', आणि स्वातंत्र्याचे 'स्वैराचारा'त केले. वर्णाश्रम धर्मातील अधिकार म्हणजे 'वर्गकलह', आणि जबाबदारीशून्य लोकशाहीतील 'अधिकार' किंवा 'स्वातंत्र्य' म्हणजे पुरोगामीपणा!! दांभिकता आणि वैचारिक दिवाळखोरीचे इतके चांगले उदाहरण दुसरे सापडणार नाही.

आजच्या 'विज्ञानाच्या' व्याख्येमध्ये प्रामुख्याने 'गणित', 'रसायन', 'पदार्थविज्ञान' व 'तंत्रज्ञान'

(पृष्ठ क्र.४० वर)

व्ही.पी.एम्.
# दिशा

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

## वर्ष अठरावे/अंक ११/नोव्हेंबर २०१७

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २२ वे/अंक ५ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | मराठी भाषेतील पोर्तुगीज शब्द | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | आरोग्यवेध-०५ व्यायामी वळवा शरीरे | श्री. नरेंद्र गोळे | ६ |
| ४) | नर्मदा परिक्रमा (भाग : ७) | श्री. अरविंद ओक | ९ |
| ५) | ओळख वनस्पतींची : महारुख/महानिंब | श्री. प्रकाश दुधाळकर | १३ |
| ६) | मरणोत्तर त्वचादान - गंभीररीत्या भाजलेल्या रुग्णांकरिता जीवनदान | सौ. स्मिता अमोल लिमये | १५ |
| ७) | कोऽहम् : एक मोहक प्रश्नायन | सौ. अपर्णा कुलकर्णी | १७ |
| ८) | गुप्तकालीन भारत : प्राचीन भारतातील 'सुवर्णयुग' | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | १९ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | २४ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# मराठी भाषेतील पोर्तुगीज शब्द

*मराठी भाषेत अनेक पोर्तुगीज शब्द सहज वापरले जातात. असे शब्द कोणते? ते मराठीत आले कसे? याची माहिती या लेखात दिलेली आहे – संपादक*

मोस्ट्राटेक (Mostratec) या विज्ञान तंत्रज्ञान स्पर्धेत सहभागी होण्याच्या निमित्ताने ब्राझीलला जाण्याची संधी मिळाली. ब्राझीलवर पोर्तुगीजांचे राज्य होते. त्यामुळे पोर्तुगीज भाषेचा तिथे प्रभाव दिसतो. रोजच्या व्यवहारात देखील लोक पोर्तुगीज भाषेचा वापर करतात. दुकानाच्या पाट्या अर्थातच पोर्तुगीज भाषेत आहेत. आम्ही पोर्टो आलेग्रे (Porto Alegre) विमानतळावर उतरलो. आमची राहण्याची व्यवस्था कॅम्पो बोम (Campo Bom) नावाच्या गावात असलेल्या एका हॉटेलात करण्यात आली होती. विमानतळ ते हॉटेल हे अंतर सुमारे पन्नास किलोमीटर आहे. आमची बस गावातून जात असताना मी बाहेर बघून दुकानाच्या पाट्या वाचत होतो. पोर्तुगीज भाषा लिहिण्यासाठी रोमन लिपीचा वापर करतात. त्यामुळे शब्दांचे अर्थ जरी लागले नाहीत तरी ते वाचता येतात. आम्ही आमच्या हॉटेलजवळ पोहोचणार एवढ्यात मला एक उपहारगृह दिसले. त्या उपहारगृहाच्या पाटीवर चक्क बटाटा (Batata) असे रोमन लिपित लिहिले होते.




**बटाट्याचे पदार्थ येथे मिळतील असे दाखविणारा फलक**

उपहारगृहाच्या जवळच कुलूप दुरुस्तीचे दुकान होते. त्या दुकानाच्या पाटीने माझे लक्ष वेधून घेतले. तेथे चक्क 'चावी टाळे' असे शब्द लिहिले होते. हॉटेलमध्ये नावाची नोंदणी करून खोलीत पोहोचलो तर तेथे पोर्तुगीज भाषेत एक सूचना होती. त्यात लिहिले होते की, 'जर तुम्हाला खोलीतील लॉकरचा उपयोग करावयाचा असेल तर रिसेप्शन काऊंटरवर चावी (Chave) मागा.' आधी बटाटा आणि आता चावी हे दोन मराठी शब्द पोर्तुगीज भाषेत पाहून मला जरा आश्चर्यच वाटले. या दोन भाषांतील सारखेपणा एवढाच आहे, की आणखी काही सारखे शब्द आहेत याचा मी शोध घेऊ लागलो. या प्रयत्नातून बरीच नवीन माहिती मला मिळाली. ती दिशा मासिकाच्या वाचकांसाठी या लेखात देत आहे.




**चावी टाळे दुरुस्तीचे कॅम्पो बोम मधील दुकान**

सोळाव्या शतकात औद्योगिक क्रांतीने (Industrial Revolution) युरोपात चांगलेच मूळ धरले. त्यामुळे युरोपातील अनेक देश सधन झाले. अनेक प्रकारचे कारखाने या देशांमध्ये उभे राहिले. या कारखान्यांमध्ये निर्माण होणारा माल बाहेर देशात जाऊन विकण्याची निकड त्यांना वाटू लागली. काही देशांनी आशिया खंडाकडे, काहींनी ऑफ्रिकेकडे, तर काहींनी अमेरिकेकडे

खर्च केलेला पैसा परत येत नाही. – प्लॉटस

आपला मोर्चा वळविला. सोळाव्या शतकाच्या पूर्वार्धात पोर्तुगीज भारतात आले. भारताच्या पश्चिम आणि पूर्व किनाऱ्यावर त्यांनी आपल्या वसाहती निर्माण केल्या. अठराव्या शतकात जेव्हा इंग्रज भारतात आले तेव्हा त्यांना आपला गाशा गुंडाळावा लागला. तरीही गोवा, दमन आणि दीव आपल्या ताब्यात ठेवण्यात त्यांना यश आले. सात बेटांची मुंबई त्यांच्या ताब्यात अनेक वर्षे होती. खरे तर मुंबईचे बॉम्बे (Bombay) हे नाव पोर्तुगीजांनीच ठेवले होते. पोर्तुगीज भाषेत बॉम (Bom) म्हणजे चांगले आणि बे (Bay) म्हणजे खाडी. पोर्तुगीज जेव्हा पहिल्यांदा या बेटावर आले तेव्हा मुंबई हे एक चांगले बंदर असल्याचे त्यांच्या लक्षात आले. म्हणून त्यांनी या बेटाला बॉम्बे (Bombay) असे संबोधायला सुरुवात केली. याच बेटावर त्यांनी प्रथम वसाहती सुरू केल्या. तसेच त्यांनी आपले प्रार्थनास्थळ म्हणजे चर्च या बेटावर बांधले. त्यातले दादर येथील पोर्तुगीज चर्च हे सगळ्यात जुने आहे. त्याचे बांधकाम प्रथम १५९६ साली करण्यात आले. त्यानंतर त्याची अनेकदा डागडुगी करण्यात आली. आता जे पोर्तुगीज चर्च दादर परिसरात आहे ते १९७७ साली नव्याने बांधण्यात आले आहे.




**पोर्तुगीज चर्च दादर, मुंबई**

वरील चर्चेवरून वाचकांच्या लक्षात आलेच असेल की, पोर्तुगीज लोक आणि भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील लोक यांच्यामध्ये अनेक शतके आंतरक्रिया चालू होती. या आंतरक्रियेतून अनेक पोर्तुगीज शब्द मराठीत आले आणि रुळले. या विषयाचा अभ्यास करणाऱ्या संशोधकाच्या मते अशा शब्दांची संख्या पन्नासहून जास्त आहे. त्यात तत्सम शब्द जसे आहेत तसेच तत्भव शब्ददेखील आहेत. या शब्दांचे वर्गीकरण संशोधक चार गटात करतात.

१. घरातील वस्तू
२. भाज्या आणि फळे
३. व्यापार आणि तंत्रज्ञानाशी संबंधीत शब्द
४. राजकीय, सामाजिक आणि धार्मिक शब्द

या चारही गटांतील शब्दांची काही उदाहरणे पाहू या.

घरात आपण अनेक प्रकारच्या वस्तू वापरतो. त्यातील बऱ्याच वस्तूंची नावे पोर्तुगीज भाषेतून आलेली आहेत. खालील तक्ता पाहा.

**तक्ता १ : घरातील वस्तू**

| क्रमांक | पोर्तुगीज शब्द | मराठी शब्द |
|---|---|---|
| १ | Prato | परात |
| २ | Gamela | घमेले |
| ३ | Pipa | पिम्प |
| ४ | Sabao | साबू |
| ५ | Bacia | बशी |
| ६ | Pav | पाव |
| ७ | Chave | चावी |

आपल्या जेवणात अनेक भाज्यांचा आपण समावेश करतो. तसेच आपल्या खाण्यात आपण अनेक फळांचा उपयोग करतो. कोणत्या भाज्या आणि फळांची नावे पोर्तुगीज भाषेवरून आली आहेत हे पाहणे फारच मनोरंजक आहे. असे शब्द पुढील तक्त्यात दिलेले आहेत.

अनेक जण दुसऱ्यांना धमक्या देतानाच भीतीने कापत असतात! - डब्ल्यू. जी. बेनहॅम

**तक्ता २ : भाज्या आणि फळांची नावे**

| क्रमांक | पोर्तुगीज शब्द | मराठी शब्द |
|---|---|---|
| १ | Batata | बटाटा |
| २ | Kobi | कोबी |
| ३ | Caju | काजू |
| ४ | Pera | पेरू |
| ५ | Ananasa | अननस |
| ६ | Peres | पायरी |
| ७ | Papaia | पपई |

युरोपात विकसित झालेले विज्ञान आणि तंत्रज्ञान घेऊन पोर्तुगीज येथे आले होते. या विषयांशी सम्बधीत शब्दांचा अर्थातच मराठीवर प्रभाव पडला. खालील तक्ता पाहा.

**तक्ता ३ : विज्ञान, तंत्रज्ञान, व्यवसाय यांच्याशी संबंधित शब्द**

| क्रमांक | पोर्तुगीज शब्द | मराठी शब्द |
|---|---|---|
| १ | Armada | आरमार |
| २ | Cartucha | काडतूस |
| ३ | Pistool | पिस्तूल |
| ४ | Pagar | पगार |
| ५ | Ingraji | इंग्रजी |
| ६ | Prancho | परांची |
| ७ | Umbereira | उंबरा |

धर्मप्रसार हा पोर्तुगीजांचा मुख्य उद्देश होता. त्यासाठी स्थानिक लोकांशी संपर्क साधण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्याचबरोबर त्यांनी अनेक सामजिक कामे हातात घेतली. त्यातून अनेक पोर्तुगीज शब्द मराठीत आले. हे शब्द पुढील तक्त्यात दिलेले आहेत.

**तक्ता ४ : धार्मिक व सामाजिक शब्द**

| क्रमांक | पोर्तुगीज शब्द | मराठी शब्द |
|---|---|---|
| १ | Natal | नाताळ |
| २ | Pagoda | पगोडा |
| ३ | Padre | पाद्री |
| ४ | Cristao | ख्रिश्चन |
| ५ | Krus | क्रुस |
| ६ | Tronco | तुरूंग |
| ७ | Sorte | सोडत |

जेव्हा दोन संस्कृती एकत्र येतात तेव्हा त्यांच्यामध्ये देवाण-घेवाण होते. पहिला प्रभाव पडतो तो भाषेवर. अशा पद्धतीने भाषा समृद्ध होत जाते. मराठी भाषेतील बहुतांशी शब्द संकृत भाषेतून आले आहेत. त्याचबरोबर शेजारील राज्यात असलेल्या भाषेचा देखील मराठीवर प्रभाव पडलेला आहे. त्यामुळे कन्नड आणि तेलगू या भाषांतील अनेक शब्द मराठीत आले. मुस्लिम अमदानीत अरबी आणि फारशी भाषेचा मराठीवर प्रभाव पडला. इंग्रजी अमदानीत त्यांच्या भाषेचा प्रभाव पडला. अशा पद्धतीने मराठी भाषा समृद्ध होत गेली. भाषेतील देवाण-घेवाणीचा अभ्यास 'सांस्कृतिक भूगोल' (Cultural Geography) या शाखेत केला जातो. या विषयाचा अभ्यास करणे हे समाजाचा विकास समजून घेण्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहे.

**- डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा, वैभवनगरी,
कल्याण-शीळ रोड,
काटई, ता. कल्याण,
जि. ठाणे - ४२१२०४

•••

# आरोग्यवेध-०५ व्यायामी वळवा शरीरे

*'योग आणि व्यायाम' या विषयी शास्त्रीय माहिती या लेखात विशद केली आहे. - संपादक*

'योग-एक जीवनशैली' हे नाव आहे एका पुस्तकाचे. ज्याचे लेखक आहेत डॉ. नंदकुमार गोळे. मात्र 'तो' मी नव्हेच. ते मात्र स्वतः डॉक्टर असण्यासोबत योगशिक्षकही आहेत. मी जेव्हा योगाची माहिती शोधत होतो, तेव्हा योगाबाबत शास्त्रीय माहिती असलेली अनेक पुस्तके माझ्या वाचनात आली. त्यातील दोन पुस्तके निकम गुरुजींच्या अंबिका योग कुटीरची आणि दोन जनार्दनस्वामींच्या योगाभ्यासी मंडळाची होती. ही पुस्तके योगाभ्यासी गुरूकुलांची होती. मात्र, डॉक्टर असून योगशिक्षक झालेल्या गोळ्यांच्या पुस्तकाबद्दल मला कुतूहल निर्माण झाले. मी ते वाचले आणि मला जाणवले ते हे की, मला हवी तशी शास्त्रीय माहिती त्यात उत्तम रीतीने दिलेली आहे. आपणही ती अवश्य वाचा. योग आणि व्यायाम एकच नाहीत. योगात रक्तदाब कमी होतो, तर तो व्यायामात वाढतो. ह्याचे सविस्तर निरुपण त्यांनी ह्या पुस्तकात केलेले आहे. अवश्य वाचावे.

हठयोग म्हणजे काय? माझा तर आताआतापर्यंत असाच समज होता की; कुठे अंगठ्यावर उभे राहून तपश्चर्या कर, कुठे वायू भक्षण करून जग, असली खडतर व्रते म्हणजेच हठयोग असावा. मात्र, 'ह' म्हणजे सूर्य आणि 'ठ' म्हणजे चंद्र. सूर्य-चंद्र, दिवस-रात्र, प्राण-अपान, धन-ऋण इत्यादी द्विस्तरीय प्रणालींमध्ये जग वाटले गेलेले असते. त्या दोन्ही स्तरांतील संतुलन साधणे म्हणजे 'हठयोग' असे निकम गुरुजींच्या पुस्तकात सांगितलेले आहे. जीवनातील द्वैतात अद्वैत शोधण्याचे काम निकम गुरुजींनी फारच सोपे करून सांगितलेले आहे. ते पुस्तक आपण मुळातच वाचावे.

प.पू. जनार्दनस्वामींच्या पुस्तकातील सूर्यनमस्कार मला सर्वात शास्त्रशुद्ध वाटले. त्यातील इतरही सांघिक आसने करून पाहण्यासारखी आहेत. लहानपणी स्वतः जनार्दनस्वामींच्या मार्गदर्शनाखाली सांघिक आसने करण्याचे सौभाग्य मला अनेकदा लाभले. मात्र त्यावेळी मला तो जुलुमाचा रामराम वाटे. झडझडून धावपळ करण्याच्या अवखळ वयात, सावकाश हातवारे करण्याने काही साध्य होईल असे मला मुळीच वाटेना. पुढे त्यांचे 'योगस्वरूप' नावाचे पुस्तक मोठेपणी वाचल्यावर मात्र माझी मते बदलली.

ज्या 'सम्यक जीवनशैली परिवर्तना'बाबत मी सतत लिहीत आहे, त्याचा एक अविभाज्य भाग म्हणजे योगसाधना. हृदयविकारनिवारणार्थ आजकाल प्रत्येक प्रगत उपचारप्रणाली मग ती उपखंडीय असो वा अपूर्व (पाश्चिमात्य); योगास उच्च कोटीचे साधन मानते. हृदयोपचाराचा एक भाग म्हणून त्याचा उपयोग करण्याआधी योग स्वतःहून काय आहे ते जाणून घेणे आवश्यक वाटल्याने हा योगाच्या समर्थनाचा प्रपंच केला आहे. योग म्हणजे आपल्या संस्कृतीची संपत्ती आहे. आपल्याकडे पुस्तक प्रदर्शनांमध्ये योगावरील पुस्तकांचे ढीग सापडतात. जरूर वाचावेत. आपण योगाच्या पालनासाठी आणि संवर्धनासाठी वेळ खर्च केल्यास आपले आयुरारोग्य वाढेल ह्यात काय संशय?

**व्यायामातील प्रकारांची सुयोग्य निवड**

विहाराकरता चालायला हवेच. पण व्यायाम म्हणजे विशेष आयाम. ज्यासाठी विशेष प्रयत्न करायला लागतात

असे आयाम. श्वसनशक्ती वाढवण्यासाठी प्राणायाम, स्वस्थता साधण्यासाठी योगासने, दमश्वासासाठी हळू-हळू धावणे, वजन कमी करण्यासाठी दोरीवरच्या उड्या मारणे, कर्तबक्षमता वाढवण्यासाठी मल्लखांबावरचा व्यायाम, स्नायूंच्या सबलीकरणासाठी वजने उचलणे, दंड-बैठका इत्यादी व्यायाम करावेत. सूर्यनमस्कार, सायकल चालवणे आणि पोहोणे हे सर्वंकष व्यायाम आहेत. त्यामुळे मानवी शरीराच्या स्वायत्ततेवरील मानसिक अडसरही (इन्हिबिशन्सही) दूर होऊ शकतात.

दीर्घकालीन आजारातून उठलेल्या (कावीळ, हिवताप इत्यादी), वयपरत्वे येणाऱ्या अवनतीकारक रोगांनी संत्रस्त आणि अतिशयच थकवा वाटत असणाऱ्या लोकांनी सुरुवातीसच अवघड व्यायाम करू नयेत. आधी त्यांनी लवचिकतेसाठीच्या व्यायामांपासून सुरुवात करावी. झेपेल तसतसे, ते ते उत्तरोत्तर अवघड होत जाणारे व्यायाम क्रमशः अंगिकारावेत. आधी योगासने, मग प्राणायाम, सूर्यनमस्कार, जलद चालणे, संगीतासोबत केलेले सतत-संजीवित हालचालींचे व्यायाम (एॅरोबिक्स), धावणे, दोरीवरच्या उड्या, सायकल चालवणे, पोहोणे, जोर-बैठका, वजने उचलणे इत्यादी इत्यादी.

**दैनंदिन सांघिक योगासने**

समाधानाय सौख्याय नीरोगत्वाय जीवने ।
योगमेवाभ्यसेत् प्राज्ञः यथाशक्ती निरंतरम् ।।

म्हणजे : समाधानी, सुखी व निरोगी जीवनाकरता बुद्धिमान लोक नेहमी योगाचाच अभ्यास करतात.

हा डॉ. श्री. भा. वर्णेकरांनी लिहिलेला श्लोक ज्या संस्थेचे घोषवाक्य आहे त्या नागपूरच्या जनार्दनस्वामी योगाभ्यासी मंडळाच्या संकेतस्थळावर दैनंदिन योग प्रात्यक्षिके (http…//www.jsyog.org/online%20yoga. htm) या दुव्यावर अनेक आसनांची सुबक संगणकीकृत प्रात्यक्षिके दिलेली आहेत. त्यातील पवनमुक्तासन सगळ्यांनी नियमित करावेच असे आहे. इतरही शक्य ती सर्व आसने नेहमीच करत असावीत. सकाळी उठून सांघिकरित्या योगासने करण्याला जनार्दनस्वामी खूप महत्त्व देत असत.

**लवचिकतेकरता करावयाच्या कसरती**

शरीर लवचिक राहावे ह्याकरता नियमित व्यायाम करण्याची गरज असते. शरीराची स्वस्थता शारीरिक हालचालींवरच कायम टिकते. शरीराची स्वस्थता वाढविणे ही नियमित व्यायामाच्या आधारेच शक्य असते. उपजीविकेसाठी शारीरिकदृष्ट्या अहोरात्र कार्यरत राहण्याची गरज पडत असते अशा लोकांना कृत्रिमरित्या व्यायाम करत बसण्याची मुळीच गरज नसते. मात्र आपल्या आजच्या जीवनात, उपजीविकेसाठी शारीरिकदृष्ट्या अहोरात्र कार्यरत राहण्याची गरज मुळात राहूच नये अशा प्रेरणेने आपले सर्व नियोजन चाललेले असते. म्हणूनच कृत्रिमरित्या व्यायाम करण्याची गरज अपरिहार्य होते.

हात, पाय, मान इत्यादी मोठ्या स्नायूंच्या किमान हालचाली दररोज व्हायलाच हव्यात. त्याकरता उभे राहून, बसून आणि शवासनस्थितीत असताना पर्वतासन अवश्य करावे. म्हणजे हातापायांचे स्नायू ताणले जातात. दररोज किमान शंभर पावले टाचांवर आणि तेवढीच पावले चवड्यांवर अवश्य चालावीत. त्याने पावलांचे स्नायू ताणले जातात. पाय जुळवून उभे राहून, हात शरीरास चिकटून ठेवावेत आणि एकावेळी एक एक पाय सरळ ताठ वर उचलावा व तसाच मागेही नेण्याचा प्रयत्न करावा. हात समोर जमिनीसमांतर ठेवून एकावेळी एक एक पाय सरळ ताठ वर उचलून हाताच्या तळव्यास टेकविण्याचा प्रयत्न करावा. तसेच पाय बाजूला ताठ वर करून, विमानाच्या पंखांप्रमाणे जमिनी समांतर पसरलेल्या हाताच्या तळव्यास टेकविण्याचा प्रयत्न करावा.

मग सरळ उभे राहून, हात सरळ समोर ताठ जमिनीसमांतर ठेवून, तळवे जमिनीकडे करून, चवड्यांवर, श्वास सोडत उकिडवे बसावे आणि नंतर श्वास घेत पूर्ववत उभे राहावे. पद्मासनात बसून ब्रह्ममुद्रा कराव्यात.

---

एकटा विचार मात्र अमर असतो. - ओ. मेरेडिथ

म्हणजे मान दोन्ही बाजूंस समोर-मागे सावकाश वाकवून पाहावी. कुठल्याही एका खांद्यावर कान टेकवून मग हनुवटी छातीला टेकवत दुसरा कान दुसऱ्या खांद्यावर आणावा. असेच विरुद्ध बाजूनेही सावकाश करावे. उजव्या तळव्याने डाव्या खांद्यावर आणि डाव्या तळव्याने उजव्या खांद्यावर एकाच वेळी थोपटावे. भीमरूपी म्हणताना जसा समोर नमस्कार करतो, तसा नमस्कार हात मागे नेऊन, तळवे एकमेकांस पूर्णपणे चिकटवून करावा. वरील सर्व हालचाली सावकाश कराव्यात आणि अंतिम अवस्थेत काही क्षण स्थिर राहावे. ह्या हालचाली दिवसातून किमान दोनदा केल्यास लवचिकता सांभाळता येते.

प्रतीक्षेत राहिल्याने, उत्सुकता ताणली गेल्याने, अनिश्चिततेने, भीतीने आणि तासचे तास अवघडून उभे अगर बसून राहिल्याने शरीरात ताण निर्माण होतात. ते ताण साठविण्याच्या विवक्षित जागा शरीरात ठरलेल्या आहेत. त्या म्हणजे मान, खांदे, पाठ, कंबर, गुडघे आणि घोटे. लवचिकतेसाठी केलेले व्यायाम ह्या सहाही जागा मोकळ्या करण्यात मदत करतात.

लवचिकतेसाठी सूर्यनमस्काराचा व्यायाम खूपच छान आहे. तो सगळ्यांकरता सारखाच उपयुक्त आहे. आबालवृद्ध, स्त्री-पुरुष, गरीब-श्रीमंत. पुण्याच्या क्रीडाभारतीचे संकेतस्थळ, त्यांची डॉक्युमेंटरी अवश्य पाहावी. आचरणात आणावी.

**चढ-उतार**

शरीराची स्वस्थता टिकवून ठेवण्याचा हल्लीच्या परिसरांमधील उत्तम व्यायाम म्हणजे जिने चढणे आणि उतरणे. 'ताठ कणा' ह्या आपल्या आत्मचरित्रात सायन शुश्रुषालयाचे माजी अधिष्ठाता डॉ. रामाणी स्वतःचे स्वास्थ्य टिकवून धरण्याचे रहस्य म्हणून जिने चढणे आणि उतरणे ह्या व्यायामाचा दाखला देतात. ते स्वतः हा व्यायाम दररोज अनेकदा स्वखुशीने करतात. चढतांना गुडघ्यांवर शरीराच्या वजनाच्या सहापट भार पडत असल्याने, खूप सारी ऊर्जा खर्च होतेच शिवाय म्हातारपणी लवकर सांधेदुखी होत नाही. चार-पाच मजले दररोज चार-पाचदा चढ-उतार केल्यास प्रकृती निरोगी राहते. ह्या कारणामुळे पाचव्या मजल्यावर गच्चीसकट घरे घेणारे अनेकजण मी खरोखरीच आरोग्यपूर्ण जीवन जगतांना पाहिलेले आहेत, यामुळे असेल. तिथेही उद्‌वाहकाचा उपयोग न केल्यास जास्त ऊर्जस्वल वाटतेच आणि उत्साहही कायम राहतो.

**अवघड व्यायाम**

मात्र, स्वस्थतेत वाढ करायची असेल तर ह्याहूनही जास्त आणि अवघड व्यायाम करण्याची गरज भासते. मैदानी खेळ खेळणे, सायकल चालविणे, पोहोणे, धावणे, वजने उचलणे इत्यादी. डॉ. अभय बंग ह्यांच्या 'माझा साक्षात्कारी हृदयरोग' ह्या पुस्तकात त्यांनी त्यांची हृदयधमनी उल्लंघन शस्त्रक्रिया झाल्यानंतर, स्वस्थता कशी कशी वाढवत नेली ते सविस्तर लिहिले आहे. ते अवश्य वाचावे. ह्या सर्व व्यायामाचे उद्दीष्ट विश्रांत हृदयस्पंदनदर कमी करणे, परिश्रमापश्चात वाढलेला हृदयस्पंदनदर, कमीत कमी वेळात विश्रांत हृदयस्पंदनदरापर्यंत पूर्वपदी येण्याची क्षमता निर्माण करणे आणि एकूण जास्तीत जास्त अवघड काम लवकरात लवकर साधण्याची हातोटी कमावणे ह्या तीन निकषांवर आधारलेले असायला हवे. हे तीनही निकष सहज समजता येण्याजोगे, सहज मोजता येण्याजोगे आणि कष्टसाध्य आहेत.

**वेळ मिळेल तसा उपयोगात आणा**

स्वस्थता वाढविण्याच्या नादात, त्यासाठी दिवसाकाठी किती वेळ आपण देत आहोत ह्याचे भान अवश्य ठेवायला हवे. शरीरश्रमांवर आधारित व्यवसाय करणारे, जसे की व्यावसायिक खेळाडू, मजूर, कुस्तीगीर इत्यादिकांना त्याखातर जास्त वेळ देणे आवश्यकच असते आणि तसा तो उपलब्धही असतो. सामान्य

(पृष्ठ क्र.१४ वर)

या जगात विचाराइतकी दृढ गोष्ट दुसरी नाही. - इमरसन

# नर्मदा परिक्रमा

**भाग : ७**

*नर्मदा परिक्रमेतील हा पुढचा टप्पा. लेखकाचे चौफेर निरीक्षण, भेटलेली माणसे या नोंदी वाचण्यासारख्या आहेत - संपादक*

**दिवस १२ वा. सोमवार ३/१२/२०१३**

रात्र हजुरी लॉजमध्ये काढली. सकाळी स्नान करून लॉज सोडले व घाटावरील (नदी किनाऱ्याजवळचे) डॉ. जडये यांचे दत्तमंदिर शोधून काढले. स्टेशनपासून हे अंतर दोन किलोमीटर असावे.

दत्तमंदिराच्या दर्शनानेच इथे येण्याचे सार्थक झाले. अतिशय सुंदर, नीटनेटके, स्वच्छ व रंगरंगोटी केलेले दत्तमंदिर आणि भोवतालचा राखलेला निसर्ग मनोहर परिसर समोरचा. मंदिरा इतकाच ३०० वर्षे वयाचा औदुंबर, त्याला बांधलेला सुंदर चौकोनी पार व बुंध्यापाशी छोटी शिव घुमटी.




मंदिर प्रशस्त आहे. सभागृह मोठे लांब-रुंद असून मोठ्या प्रवेशद्वारा व्यतिरिक्त दोन्ही बाजूला (मध्यापर्यंत) ३-३ जाळगज (ग्रील) दरवाजे आहेत.

गर्भागार १७''x१७'' असावे. दत्तमूर्ती एकमुखी आहे. १६''x२०'' ७.२५'' रुंद असा पांथस्थ निवास; जिथे रुंदी सोडून १०''x३'' असे चार प्रशस्त कप्पे सामानासाठी केलेले आहेत. ४ खिडक्या आहेत. १०'' लांब x ४''रुंद पडवी या ग्रिलबंद निवासाला आहे.

रात्री आलो असतो तर मंदिर सापडले नसते खचित. शिवाय रात्री ९॥ नंतर २ कि.मी.ची चाल म्हणजे चौकशीला कुणी सापडले नसते. तसे मंदिर रस्त्याच्या हिशेबाने खूपच आत व एकान्तात आहे. मंदिर पूर्वाभिमुख आहे व मंदिराच्या डाव्या हाताला पश्चिम वाहिनी मैय्या आहे. प्रवाह पुष्कळ दूर आहे. कारण मधल्या भागात वाळवंट आहे.

सकाळी मंदिरात आलो. शर्मा पुजारी यांच्या आईने स्वागत केले. मंदिर, सत्पुरुष इत्यादी इत्थंभूत इतिहास सांगितला व मंदिराकडून काही मिळत नाही हे ओघात कळले. प्राप्त कठीण परिस्थिती सांगताना माईंच्या डोळ्यांतून अश्रू आले.

तेलवातीसाठी म्हणून मी लगेच एकशेएक रुपये काढून दिले.

मंदिर पाहून जावे या विचाराने काल स्टेशनवर खांडवा गाडीची चौकशी करून ठेवली होती. दुपारी दोन वाजता (१.४० दु.) पठाणकोट एक्सप्रेस आहे त्याने ओंकारेश्वरास जावे असे ठरविले होते.

मंदिर अप्रतिम आहे हे जड्यांना फोनवर सांगितले व त्यांनी 'पाहिजे तर राहा' असे सांगितले आणि मला अत्यानंद झाला. 'सकाळी ९ वाजता कामयानी एक्सप्रेस आहे' हेही सांगितले.

नाहीतरी मी प्रथमदर्शनीच मंदिराच्या मोहात पडलो होतो.

दरम्यान माईंनी मुलाच्या हस्ते चहा पाठविला. हा धाकटा मुलगा नोकरीला आहे. सकाळी तो मुलांना सोडायला बाईकवर शाळेत गेला होता. वाटेत त्याने मला पाहिले होते.

औदुंबराजवळ पूजा करतात कळल्यावर मी पूजेची तयारी मांडली व अनुज्ञेने हातपंपावर कपडे धुण्यासाठी गेलो. कपड्यांना साबण लावून ठेवावा व नंतर पूजा आटोपल्यावर कपडे धुवून टाकावे असा विचार होता.

इथलाही हातपंप बर्गी धर्मशाळेतील पंपाप्रमाणेच होता. स्वच्छता होती.

सामानसुमान मी पांथस्थ निवासात हलविले व कपडे धुवायला गेलो. साबण लावत असता कुणीतरी स्कूटरवरून आले. बरोबर कुणी कामगार असावा. इथे कपडेबिपडे धुवायचे नाहीत. हे फक्त पिण्याचे पाणी आहे असे माझ्यावर डाफरला. ब्रजकिशोर यांच्या अनुज्ञेने मी इथे धुणे धूत आहे हे सांगितल्यावर काही बोलला नाही. परंतु कामगाराला शिवीगाळ करीत होता.

मंदिराची देखभाल, रंग रंगोटी सुरू आहे. त्याच्याशी संबंधित कुणी असावे.

पूजा आटोपता माई आल्या. त्यांना मी ही गोष्ट सांगितली. ''जड्यांकडून आलो आहे असे सांगा' असे त्या म्हणाल्या. परंतु मी तसे आधीही केले नव्हते व आताही सांगितले नसते.

पूजा आटोपली, कपडे धुतले. क्लॉथ लाइन बहुधा बर्गीला राहिली असावी. सोडून गुंडाळल्याचे आठवते!

केरसुणी मागून घेतली व पांथस्थ निवास स्वच्छ झाडून काढला. जळमटे व धूळ!

पांथस्थ निवासाच्या ओसरीवर डायरी लिहिण्यासाठी बसलो आहे. स्वच्छ, धुतलेले कपडे घातले आहेत. जेवणाचा डबा तासापूर्वी म्हणजे ११।। वाजता माईंनी आणून दिला आहे.

मंदिर व प्रांगणात रंगाचे काम सुरू आहे. भोजनापूर्वी गाभाऱ्यात बसून दत्तगुरु -२४ कवन म्हटले. म्हणताना भाव उमलून आला होता. पाठोपाठ शिवमहिम्न, एक श्लोक संस्कृत, पाठोपाठ मराठी रुपांतर या क्रमाने ३१ + समारोपाचे माझे श्लोक म्हटले.

दोन नंतर जेवलो. रोट्या (जाड), ताक, भाजीपैकी २।। रोट्या खाल्ल्या. अजून ४ ते ५ रोट्या शिल्लक राहिल्या. भोजनानंतर डबा धुवून ठेवला (कॅरिअर डबा).

प्रांगणात बरीच मंडळी रंगकाम करताना दिसू लागली. कळले की हे अंतरकर कुटुंब आहे व दरवर्षी दत्तजयंतीनिमित्त स्वखर्चाने रंग स्वतः लावतात. दोन एक मजूर सोडले तर ५ सभासद अंतरकर कुटुंबाचे होते. मंदिर पार, ओटे रंगविण्याचे काम तन्मयतेने ही मंडळी करीत होती. सुरुचि (२६ वर्षे) अंतरकरसुद्धा हे काम करीत होती. जवळच्या नात्यातून १० हजार रुपये या प्रमाणात कुटुंबाने स्वतःच लाख रुपये यासाठी जमविले.

सुधाकर केशवराव अंतरकर ६९ वर्षे
पद्माकर रामचन्द्रराव अंतरकर ६९ वर्षे
मधुसूदन रामचन्द्र अंतरकर ६७ वर्षे
चंद्रशेखर केशवराव अंतरकर ६१ वर्षे व
सुरुचि चन्द्रशेखर अंतरकर २६ वर्षे



या साऱ्यांची ओळख झाली. छान वाटले. यांचे फोटो काढले. गुळवणी महाराजांना जिथे दीक्षा दिली गेली त्या वास्तुचे फोटो काढले, एका समाधीचे फोटो काढले व मंदिर व परिसर यांचेही भरपूर फोटो काढले.

जड्यांनी मोने यांना भेटायला सांगितले होते. त्यामुळे जुमेरत इलाख्यात गेलो. फार दूर नव्हता. परंतु सुधीर मोने बाहेर गेल्याने भेटले नाहीत. मुलाशी बोलणे झाले ते घराच्या अंगणातच! पाणी मागून प्यायलो व परतलो.

वाटेत भगवतीप्रसाद शर्मा हे मंदिर व्यवस्थापक भेटले. मंदिर प्रांगणातील झाडे यांनी लावली आहेत. विशेषतः फळझाडे!

हे ट्रस्टी आहेत. बीजेपी युनियनचे काम करतात. वय ५८ वर्षे. एक परिक्रमा यांनी केली आहे.

गप्पांमध्ये अर्धा तास गेला, मला बाईकवर मंदिरापाशी सोडून ते परत गेले.

मी एकटाच आता आहे. पुजारी ८ वाजता पूजा करून निघून जातील. त्रिपद शर्मा या मुलाने जेवणाचा डबा आणून दिला आहे आणि मी मंदिरात बसून नर्मदा पूजनानंतर डायरी लिहित बसलो आहे.

रात्री इथे इतका एकान्त आहे की मानव स्पर्श विरहीत आणि पूर्ण काळोख्या निसर्गाच्या कुशीत मी विसावलो आहे. आजूबाजूला कुणी नाही. परंतु भीतिदायक वाटत नाही.

मंदिरातला बल्व खूप प्रकाश देतोय. पांथस्थ निवासातील सीएफएल छोटा असला तरी पुरेसा वाटतोय. रात्री अंधारातून नको म्हणून जेवायच्या अगोदर हातपंपावर बादलीभर पाणी आणून ठेवले.

जेवायला भात, वरण, भाजी होती. थोडा भात वरण उरला.

थंडी खूप नव्हती. कॉटवर तेथले कांबळे अंथरून वर स्लीपिंग बॅगचे आसन लावले. ऑडोमॉस महाराजपूरला घेतले होते. पण तिथे चेहऱ्यावर एकदा लावले. आज वाटले होते पण गरज भासली नाही.

पांथस्थ निवासाचे ग्रिल व कुलूप लावल्याशिवाय मी हलत नव्हतो. इथे कुणी इतक्या दूर व रात्री /पहाटे चोरी करेलसे वाटत नाही पण धोका पत्करणे नको म्हणून ही काळजी किंवा मौल्यवान वस्तू घेऊन ती पिशवी घेऊन वावरायचे. मग ग्रिल लावले न लावले तरी चालेल (ग्रिल उघडते पटकन पण लावायला त्रास होतो!)

रात्री पंखा लावला होता. पहाटे बंद केला. आभाळ असले की थंडी कमी असते.

नित्याप्रमाणे ५ वाजता उठलो स्नान इ. आटोपून मंदिरात प्रार्थना केली. नंतर पुजारी वीरेन्द्र शर्मा आले. त्यांनी पूजा केली.

मी वस्तू सकाळीच आवरून ठेवल्या होत्या. काल संध्याकाळी सुधीर मोन्यांचा जुमेरत मधील पत्ता शोधत गेले होते. कारण जड्यांनी भेटायला सांगितले होते. परंतु ते भेटले नाहीत. मुलगा होता परंतु अंगणातच वार्तालाप झाला. घरात मात्र घेतले नाही.

सकाळी ८ वाजता निघालो. जाताना वीरेन्द्रच्या आईने थांबवून चहा दिला. तिच्या पाया पडून स्टेशन गाठले.

नऊ वाजता कामयानी (वाराणसी-मुंबई) एक्स्प्रेस येथे मी पावणे नऊला हजर झालो.

वरिष्ठ नागरिक होशंगाबाद-खंडवा रु.४०/- गाडी अर्धातास उशिरा आली. (२२० कि.मी.)

पहिले ५ डबे अनारक्षित पण ते इतके भरले होते

---

किरकोळ चोरी करणाऱ्यांना आपण फासावर चढवतो, तर बड्या चोरांना सलाम करतो. - जर्मन म्हण

की एकाही दारातून आत प्रवेश मिळेना. गाडी सुटली. धावत मागे गेलो तो ६ वा डबा एसी. पुन्हा पळत ५ वा डबा. मी गाडीबरोबर धावतोय, दारात गर्दी, अखेर एकाने मला हात देऊन आत ओढले. सामान ठेवणार कुठे? दादापुता करून सॅक कुणाच्या तरी बॅगवर ठेवली. इंचभर हलू शकत नाही अशी गर्दी. त्यातच दुखऱ्या बोटावर कुणाचा पाय पडतोय!



ज्या तरुणाने मला आत ओढले त्याच्याशी गप्पा मारताना कळले की त्याचे नाव उमरअली असून तो मस्तानीचा वंशज आहे. कोकणस्थांचेही रक्त त्याच्या नसात असल्याचा त्याला अभिमान होता. मस्तानी बाजीराव आणि पुढल्या पिढ्या यांच्या संबंधातील सर्व स्थळांना त्याने भेटी दिल्या आहेत. हा खूप उत्साही, खटपट्या आणि हुशार वाटला. हरदा येईपर्यंत आम्ही गप्पांमध्ये रमल्यामुळे गर्दीचा त्रास सुसह्य ठरला. पुढला १ तास तसा कंटाळवाणा परंतु एक भिजलेले हरभरे विकणारा टोपली घेऊन चढला आणि नवल घडले. त्या गर्दीतून वाट काढत त्याने एका ठिकाणी पाठ टेकून दुसरीकडे पाय बाकाच्या आतल्या कडेला रोवला. मांडीवर पाटी ठेवून प्लेटमधून हरभरे विकू लागला. याच बोगीत त्याने ३/४ ठिकाणी ही कसरत केली व खंडण्याला उतरला तेव्हा ७५% माल संपलेला होता!

पोटासाठी का होईना परंतु हे कसब वाखाणण्या सारखेच! त्याला मी हे सांगितलेही! तो म्हणाला, 'आदत हो गई है।'

खंडवा १२।। नंतर आले. कॅन्टिनमध्ये जेवलो. कॅन्टिनमॅनेजरने गप्पा मारल्या. ३५ ऐवजी ३० रु. घेतले व पायाही पडला!

बाहेर येऊन ॐकारेश्वर बस धरली. उष्मा खूप होता. यावेळी बॅग/सॅक डिकीत न ठेवता मांडीवर ठेवली. ४ नंतर ॐकारेश्वरला पोहोचलो. (७०रु.)

ॐकारेश्वरावर दुपारी ४ नंतर जल अर्पण केले जात नाही. पण ममलेश्वरावर चालते म्हणून त्या मंदिरात जाऊन ब्राह्मणाकडून समापन केले. अर्धी कुपी जल शिवलिंगावर अर्पण केले व पूजा आटपून नर्मदाजलाने प्यायच्या पाण्याची बाटली भरून घेतली व ६ च्या बसने इंदौर गाठले. बन्सीचा संपर्क नाही. वागळे स्वतः न्यायला स्टँडवर आले होते. (६.१५ ते ८.३० प्रवास) ८० रु. भाडे. वागळे फार मोकळे दिसत नाहीत. राजश्री उद्या उज्जैनला चाललीय. एकाद दिवसावर राहणे होईलसे वाटत नाही.

उद्या बन्सी भेटला तर जायची तारीख नक्की करता येईल. कारण त्याच्याकडे मंदिरात मी राहू शकतो. नाहीतर उद्या परवा जावे लागेल.


**– अरविंद ओक**

मानपाडा, डोंबिवली.

भ्रमणध्वनी : ०९८३३४४१५८०


•••


दिशा नियमित वाचा.

*आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.*


प्रत्येक पाजी इसम हा चोर नसतो; पण प्रत्येक चोर मात्र पाजी असतो. – ॲरिस्टॉटल

# ओळख वनस्पतींची
# महारुख / महानिंब

*‘ओळख वनस्पतींची’ या लेखमालेतील एकविसावा भाग. ‘महारुख / महानिंब’ या वनस्पतीची वैशिष्ट्ये, त्याचे उपयोग, त्याची देखभाल या बाबींवर या लेखात प्रकाश टाकला आहे – संपादक*

मित्रांनो, बालपणातील अनेक गोष्टी मनावर कायमच्या कोरल्या जातात. माझ्या बालपणापासूनच वेगवेगळ्या झाडांनी मनाचा एक कोपरा कोणत्या ना कोणत्या कारणाने व्यापून राहिला आहे. आमच्या घरासमोरच्या रस्त्यावर एक भला मोठा वृक्ष होता. नुसता आकारच नाही तर त्याच्या फांद्या अन् पानेही मोठीच, येणारी फुलेही मोठ-मोठ्या गुच्छात येणारी. फळांचेही तेच. त्या झाडाच्या जाड बुंध्यावर अनेक खिळे ठोकले होते. हे खिळे १ मीटर ते १.५ मीटर याच उंचीवर ठोकलेले असायचे. खिळे देखील लहान सहान नाहीत. चांगले १२ ते १५ सें.मी. लांबीचे अन् ६ ते ८ मि.मी. रुंदीचे चौकोनी खिळे. कधी त्या खिळ्यांना काही विचित्र आकृत्या काढलेल्या व अगम्य भाषेत लिहिलेल्या ६ ते ८ सें. मी. लांबी-रुंदीच्या चिठ्ठ्या चिकटवून नंतर त्यावर मोठ्या हातोड्याने हे खिळे ठोकलेले असायचे. कधी कधी अक्राळ विक्राळ दिसणाऱ्या लहान कापडी बाहुल्या देखील त्या खिळ्यांना अडकवलेल्या असायच्या. हे प्रकार कोण करायचं आणि उद्देश काय होता ते मला कधीच कळले नाही. एका उन्हाळ्यात आलेल्या प्रचंड वादळात ते झाड कोसळले. सुदैवाने कोणतीही जीवीत हानी झाली नाही. त्या झाडासोबतच ते अघोरी प्रकारही थांबले. मोठी माणसं त्याबद्दल काहीच बोलत नव्हती. अन् मला त्या झाडावर होणारे अत्याचार बघवत नव्हते. अखेर वादळानेच त्याची सुटका केली. ते झाड होते महारुखाचे.



महारुख नावाप्रमाणेच महावृक्ष. अगदी ३० मीटर पर्यंत उंच वाढणारा. खोड सरळ वाढणारे अन् भल्या मोठ्या फाद्यांच्या टोकाशी असणारा मोठ्या पानांचा पसारा, खोड पांढुरक्या रंगाचे, साल अखंड अन् मऊ, पाने मोठी २५ ते ५० सें.मी. लांबीची, विषमपर्णी. लांब पर्णिकांच्या ८ ते १४ जोड्या. आकारमानात खूप फरक. प्रत्येक पर्णिका १०-१५ सें.मी. लांब व ३-४ सें.मी. रुंद. पर्णिका भालाकृती, कडूनिंबाच्या पर्णिकेसारख्या दंतूर कडा, तळ तिरपा, चव अन् वास कडवट. त्यामुळेच त्याला महानिंब या नावानेही ओळखतात.

मार्च ते मे महिन्यात या झाडास हिरवट पिवळ्या रंगाची, पाच पाकळ्यांची, १.५ सें.मी. व्यासाची, हिरवट पिवळ्या रंगाची फुले येतात. मात्र ही फुले भल्या मोठ्या गुच्छामध्ये येतात. हे गुच्छ तसे विरळ असतात. या महावृक्षाचे सर्वच भाग असे मोठे. एप्रिल-मे मध्ये या झाडावर लहान लहान सुमारे ५ सें.मी.

---

मृतांची हाडे घेऊन जिवंत व्यक्तीवर हल्ला करणे ही धर्मपंडितांची फार जुनी खोड आहे. – इंगरसोल.

लांबीच्या चपट्या शेंगांनी गर्दी केलेली असते. सुरुवातीस हिरवट रंगाच्या या शेंगा वाळताना तपकीरी होत जातात. या शेंगेमध्ये एकच बी असते. याच बियांपासून या झाडांची लागवड केली जाते. जलद वाढणारे व भरपूर लाकूड देणारे झाड म्हणून याची काही ठिकाणी लागवड केली जाते. एका झाडापासून साधारणतः २० ते ३० टन लाकूड मिळते. एवढी वाढ होण्यास साधारण १० ते १५ वर्षे लागतात.

या झाडाचे शास्त्रीय नाव आहे Ailanthus excelsa (AILANTHUS EXCELSA). Ailanthus हा शब्द Ailanthos या शब्दापासून आला आहे. ज्याचा अर्थ आहे 'स्वर्गातील झाड' अन् इंग्रजीतही India tree of heaven असेच नाव आहे. हा वृक्ष पानगळीच्या जंगलातील असला तरी कोकणातही याचे अस्तित्व दिसून येते. नाशिक व पुण्यात ही झाडे बऱ्याच ठिकाणी आहेत. तसेच बऱ्याच राज्यमार्गांच्या किंवा राष्ट्रीय महामार्गांच्या कडेला ही झाडे दिसून येतात.

या झाडाचे अनेक औषधी उपयोग आहेत. या झाडाची साल शक्तीवर्धक असून तापावर हमखास औषध आहे. पानांचा व सालीचा उपयोग बाळंतपणानंतर टॉनिक म्हणून उपयोग केला जातो. पाने व सालीचा ताजा रस वेदनाशामक म्हणूनही वापरतात. अर्थात कोणतीही औषधी वनस्पती योग्य व तज्ज्ञांच्याच सल्ल्यानेच औषधी म्हणून त्याचा वापर करणे केव्हाही चांगले. या झाडाचे लाकूड मऊ असल्याने वेगवेगळ्या कलाकुसरिच्या वस्तू करण्यासाठी तसेच आगपेटीच्या काड्या बनविण्यासाठी वापरतात. हल्ली हे झाड जंगलात क्वचितच दिसते. मात्र शहरी भागात उद्यानात किंवा रस्त्याच्या कडेला लावलेली दिसून येतात.

**– प्रकाश दुधाळकर**
एफ–२२, नीता अपार्टमेंट,
मिठागर–नवघर लिंक रोड,
मुलुंड (पू.), मुंबई – ८१.
दूरध्वनी : २१६३ ६०५२

(पृष्ठ क्रमांक ८ वरून - **आरोग्यवेध–०५ व्यायामी वळवा शरीरे**)

माणसांनी स्वस्थतासाधनेत दिवसाकाठी दोन तासांहून अधिक वेळ दिल्यास त्या प्रमाणात लाभ वाढतोच असे नाही. मात्र एक ते दोन तास शारीरिक स्वस्थता आणि आरोग्याकरता आपण वेचावे. अर्थातच सलग दोन तास असा वेळ मिळणे अवघड असते. जसा मिळेल तसा, जेव्हा मिळेल तेव्हा उपयोगात आणावा आणि जे जे त्या वेळी शक्य असेल ते ते तेव्हा तेव्हा साधून घ्यावे. असे केल्यास आपले जीवन, नैसर्गिक राहणीच्या सर्वात जवळ पोहोचू शकेल. स्वस्थ होऊ शकेल.

**नियमितता महत्त्वाची असते**

अमेरिकन विचारसरणीत सप्ताहात अमुक इतक्या कॅलरी खर्च व्हाव्यात असे मानले जाते. दैनंदिन व्यक्तिगत शारीरिक ऊर्जा गरज http...//urjasval.blogspot.com/2010/05/blog-post_4883.html#links, या दुव्यावर निरनिराळ्या शारीरिक कर्तबांकरता लागणाऱ्या ऊर्जांची सारणी दिलेली आहे. सप्ताहात पाचच दिवस व्यायाम केला तरीही पुरते असे मानले जाते. अर्थातच सप्ताहांतर्गत सवलत दिली तरी ती विचारसरणीही, त्या पश्चात सातत्याचाच पुरस्कार करते. आहार, विहार, व्यायाम, प्राणायाम ह्याबाबतीत भारतीय संस्कृतीत धरसोडीची वृत्ती क्षम्य समजली जात नाही. सातत्य आणि कर्मठपणाचे गोडवे आपली सारी शास्त्रे गातात. अनुभवांती मलाही तेच बरोबर वाटत आहे.

**– नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) – ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

•••

# मरणोत्तर त्वचादान - गंभीररीत्या भाजलेल्या रुग्णांकरिता जीवनदान

*मरणोत्तर त्वचादान हे गंभीररीत्या भाजलेल्या रुग्णांकरिता जीवनदान ठरते. याविषयीची माहिती देणारा लेख - संपादक*

त्वचा आपल्या शरीरातील सर्वात मोठे कर्मेंद्रिय व ज्ञानेंद्रिय आहे. बाह्य शरीराला सौंदर्य प्रदान करण्याबरोबरच त्वचा आपल्या शरीराचे तापमान नियंत्रित करते; तसेच सूक्ष्मजंतुंना आपल्या शरीरात प्रवेश करण्यापासून अटकाव करते. हे महत्त्वाचे कार्य पार पाडण्यासाठी आपल्या त्वचेला नैसर्गिक पुनर्निर्मितीची देणगी लाभलेली आहे. अशा या त्वचेचे एकंदरीत आठ स्तर असतात, त्यांची ढोबळमानाने बाह्यत्वचा व अंतःस्थ/आंतरत्वचा अशी विभागणी करता येईल. जेव्हा आपल्याला थोडेसे भाजते, तेव्हा फक्त बाह्यत्वचेचेच नुकसान झालेले असते. त्यामुळे तेथे मलमपट्टी केली असता त्वरीत नवीन त्वचा येण्यास सुरवात होते.पण जेव्हा शरीराच्या बऱ्याचशा भागावर (४० टक्क्यांपेक्षा जास्त) खूप खोलवर भाजते तेव्हा अंतःस्थ त्वचेचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्यामुळे व रुग्णाची वैद्यकीय परिस्थिती नाजूक असल्यामुळे त्वचेची नैसर्गिक पुनर्निर्मिती कठीण असते, जखमेच्या ठिकाणी जंतुसंसर्ग होण्याचा धोका असतो, नुसत्या मलमपट्टीने जखमा भरून येत नाहीत व हे सर्व रूग्णाच्या जीवावर बेतू शकते. अशा परिस्थितीमध्ये त्वचेच्या प्रत्यारोपणाचाच पर्याय उपलब्ध असतो. त्वचेचे प्रत्यारोपण करताना भाजलेल्या जखमेच्या ठिकाणी बाह्यत्वचेचा सर्वात बाहेरील पातळ स्तर लावला जातो. ज्यामुळे खोलवर झालेल्या भाजल्याच्या जखमा भरून यायला मदत मिळते, अंतःस्थ त्वचेची पुनर्निर्मिती होण्यास सुरवात होते, रूग्णाच्या वेदना कमी होतात व जखमेच्या ठिकाणी जंतुसंसर्ग होण्यास अटकाव होतो. एकदा रूग्णाच्या अंतःस्थ त्वचेची पुनर्निर्मिती होण्यास सुरवात झाली की प्रत्यारोपित त्वचा गळून पडते. हे त्वचारोपण रूग्णाची स्वतःची त्वचा वापरून (स्व-त्वचारोपण) अथवा दात्याची (जिवंत किंवा मृत) त्वचा वापरून होऊ शकते.

**मरणोत्तर त्वचादानच का?**

त्वचेच्या प्रत्यारोपणासाठी (स्व-त्वचा/परत्वचा) बाह्यत्वचेचा सर्वात बाहेरील पातळ स्तर काढला जातो. पण ही प्रक्रिया खूप वेदनादायक असते व काढलेल्या त्वचेच्या जागेवर पुनर्निर्मिती होईपर्यंत त्या भागाची योग्य ती वैद्यकीय काळजी घेणे महत्त्वाचे असते. अन्यथा त्याजागी जंतुसंसर्ग होण्याची भीती असते. मुळात गंभीररीत्या भाजलेल्या रुग्णाची वैद्यकीय परिस्थिती स्व-त्वचारोपणासाठी योग्य नसते आणि परत्वचारोपणासाठी दात्या व्यक्तिकरिता त्वचा काढणे ही प्रक्रिया खूप वेदनादायक असल्यामुळे मरणोत्तर त्वचादान हा सर्वोत्तम पर्याय ठरतो. कारण या प्रकारात व्यक्ती मृत असल्यामुळे वेदना होण्याचा प्रश्न नसतो व मृत्यूनंतर रक्ताभिसरण थांबलेले असल्यामुळे रक्तस्राव होत नाही. म्हणूनच गंभीररीत्या भाजलेल्या रुग्णाला जीवनदान द्यायचे असेल तर मरणोत्तर त्वचादान अत्यंत आवश्यक आहे.

म्हणूनच मरणोत्तर त्वचादानाचे संकल्प-पत्र आपण आपल्या हयातीतच भरावे आणि आपली इच्छा आपल्या जवळच्या नातलगांना कळवावी.

**त्वचापेढी (Skin Bank) म्हणजे काय? त्वचापेढीचे कार्य**

त्वचापेढी ही एक समाज उपयोगी संस्था असते, ज्यात तज्ज्ञ डॉक्टर व इतर उपयुक्त तंत्रज्ञ कायम उपलब्ध असतात. ही संस्था मृत त्वचादात्याच्या इच्छेप्रमाणे

मितपणा हा सोन्याचा लगामच म्हणायचा. - रॉबर्ट बर्टन

त्याची त्वचा काढून आणतात, ही त्वचा योग्यप्रकारे तपासून, जतन करून ठेवतात व गंभीररीत्या भाजलेल्या रुग्णांना गरज असेल तेव्हा उपलब्ध करून देतात.

**त्वचादानाकरिता पात्रतेचे निकष–**

- १८ वर्षांवरील कोणतीही व्यक्ती त्वचादान करू शकते.
- त्वचेच्या रोपणाकरिता लिंग, रक्तगट किंवा त्वचेचा वर्ण इत्यादीच्या जुळणीची आवश्यकता नसते.
- डायबिटीस व उच्च रक्तदाब असलेल्या व्यक्तिदेखील त्वचादान करू शकतात.

**त्वचादानाकरिता अपात्रतेचे निकष–**

हेपिटायटिस बी व सी, एड्स, इतर संसर्गजन्य रोग, त्वचेचा कॅन्सर, त्वचारोग, गुप्तरोग तसेच सेप्टिसेमिया इत्यादींपैकी काहीजरी मृत व्यक्तिला असेल तर मात्र मरणोत्तर त्वचादान होऊ शकत नाही.

**मृत व्यक्तिच्या नातलगाने अमलात आणावयाच्या महत्त्वपूर्ण सूचना**

- मृत्यूनंतर ६ तासांपर्यंत त्वचादान होणे आवश्यक असते.त्यामुळे इच्छुक त्वचादात्याच्या मृत्यूनंतर त्वचापेढीला (Skin Bank) लगेचच त्वचादानाविषयी कळवावे.
- मृत व्यक्तीने जरी आपल्या हयातीत त्वचादानाचा संकल्प केलेला नसेल तरीसुद्धा कुटुंबीयांच्या इच्छेने त्वचादान करणे शक्य होऊ शकते.
- डॉक्टरांकडून मृत्यूच्या कारणासहित मृत्यू प्रमाणपत्र त्वरित मिळवावे.
- मृत व्यक्तिला वेगळ्या खोलीत शक्यतो कॉटवर ठेवावे, त्यासाठी जंतुविरहीत खोलीची आवश्यकता नसते.

**त्वचादानाची प्रक्रिया–**

- त्वचापेढीला (Skin Bank) कळविल्यावर त्यांची टीम दोन तासांच्या आत सांगितलेल्या ठिकाणी म्हणजे घर, हॉस्पिटल किंवा शवागार येथे पोहोचून सर्वप्रथम मृत्यूचे कारण तपासतात. नंतर जवळच्या नातेवाईकांची ना हरकत प्रमाणपत्रावर सही घेऊन त्यांना संपूर्ण प्रक्रिया समजावून सांगतात व मगच त्वचा काढण्याच्या प्रक्रियेला सुरवात करतात.
- त्वचा काढण्याच्या प्रक्रियेच्या सुरवातीला मृताच्या रक्ताचा नमुना घेतला जातो. हे रक्त एड्स, हेपिटायटीस बी व सी व व्हीडीआरएल टेस्ट (VDRL) साठी तपासले जाते व नंतरच काढलेली त्वचा आवश्यक ती प्रक्रिया करून साठविली जाते.
- विशिष्ट यंत्राच्या (Dermatome instrument) सहाय्याने दोन्ही पोटऱ्या, मांड्या व पाठीवरील त्वचेचा सर्वात बाहेरील पातळ स्तर काढला जातो. मृत झाल्यावर रक्ताभिसरण थांबत असल्यामुळे त्वचा काढलेल्या ठिकाणी रक्तस्राव होत नाही. तरीसुद्धा त्वचा काढलेल्या ठिकाणी बँडेज बांधून मृतदेह नातलगांच्या ताब्यात दिला जातो. ह्या सर्व प्रक्रियेला फक्त ३० ते ४५ मिनिटे लागतात.
- ही काढलेली त्वचा त्वचापेढीत नेल्यावर सर्वप्रथम मृताच्या रक्ताच्या चाचण्या केल्या जातात. सर्व रिपोर्ट नकारात्मक असतील तरच त्वचेवर योग्य ती प्रक्रिया करून ही त्वचा ८५ टक्के ग्लिसेरॉलमध्ये ४ ते ८ डिग्री सेंटिग्रेड तापमानास साठवली जाते. अशाप्रकारे त्वचा ५ वर्ष टिकवून ठेवता येते.

**त्वचापेढीचे संपर्क:**

- नॅशनल बर्नस सेंटर –०२२ २७७९३३३३
- सायन हॉस्पिटल त्वचापेढी–०२२४०७६३८१ (विस्तार ४२८)

**– सौ. स्मिता अमोल लिमये**

भ्रमणध्वनी – ९९८७००४०५८

•••

# कोऽहम् : एक मोहक प्रश्नायन

*ज्येष्ठ लेखक सुरेश द्वादशीवार यांच्या 'कोऽहम्' या कादंबरीचे तत्त्वज्ञानाच्या दृष्टीकोनातून केलेले रसग्रहण - संपादक*

एरवी तत्त्वचिंतन हा वैचारिक लेख, प्रबंधलेखन अथवा शोधनिबंधलेखन अशा प्रकारच्या साहित्यकृतीचा प्रांत. परंतु तत्त्वचिंतनपर कादंबरी हा प्रकारच मुळात नव्या धाटणीचा म्हणावा लागेल. पाश्चात्य तसेच भारतीय तत्त्वचिंतनावरचे लेखन हे प्रामुख्याने वैचारिक लेखनाच्या स्वरूपात झालेले असून तत्त्वचिंतनपर कादंबरी हा साहित्यप्रकार तसा वैशिष्ट्यपूर्ण आणि आव्हानात्मक आहे. मराठीसारख्या प्रादेशिक भाषेमध्ये शास्त्रशुद्ध तात्विक चिंतन प्रमाणशीर पद्धतीने कादंबरी या स्वरुपात मांडला गेल्याचे किंबहुना पहिले उदाहरण म्हणजे सुरेश द्वादशीवारांची साधना तर्फे प्रकाशित झालेली 'कोऽहम्' ही कादंबरी होय.




तत्त्वज्ञान म्हणजे तत्त्वांचा त्यांच्या मुळापर्यंत जाऊन घेतला जाणारा शोध आणि कुठलाही शोध घ्यायचा असेल तर प्रश्न-उपप्रश्नांच्या मालिकेचा गुंता हा ओघाने आलाच. तत्त्वचिंतनाची ही पद्धत 'सॉक्रेटिस' या आद्य तत्त्वज्ञानिय रूढ केली आणि या प्रकारच्या तत्त्वचिंतनावरच्या निष्ठेसाठी तो जगला आणि मेलासुद्धा. अर्थात आपल्या भारतीय दर्शनांमध्येही खंडन-मंडन पूर्वपक्ष-उत्तरपक्ष अशी अभ्यासाची पद्धत दिसून येतेच. थोडक्यात, प्रश्न विचारणे आणि उत्तरे शोधणे हे तत्त्वज्ञानात अपरिहार्य असते. या अशा प्रकारच्या तत्त्वचिंतनात प्रामुख्याने भारतीय दर्शनांमध्ये चर्चिला जाणारा प्रमुख प्रश्न म्हणजे : 'कोऽहम्', मी कोण? आणि या प्रश्नाची अनेकविध उत्तरे भारतीय षड्दर्शनकारांनी देऊन ठेवलेली आहेत. परंतु अमुक एक उत्तरच बरोबर असे निश्चितपणे म्हणता येत नाही. हाच धागा पकडून, 'मी कोण?' या शोध सफरीवर निघालेल्या एका तरुण भारतीय संन्याशीचा जीवनप्रवास म्हणजे कोऽहम्' कादंबरी होय.

आचार्य राजशेखर - कालीमठाचे स्वामी, इला ही जर्मन स्त्री आणि प्रो. हरिप्रसाद चटट्रोपाध्याय ही या कादंबरीमधील प्रमुख पात्रे आणि राजशेखर हा कादंबरीचा नायक. अत्यंत सर्वसाधारण परिस्थिती असलेल्या कुटुंबातून आलेला राजशेखर आई, घर, शिक्षण यात गुंतलेला असताना अचानक एका प्रसंगामुळे वेगळा ठरतो आणि त्यांच्या शहरातील कालीमठातील स्वामींची अनिच्छेने का होईना त्याची भेट घडून येते. त्या भेटीतून कालीमठ आणि स्वामी यांच्याबद्दल त्याच्या मनात आकर्षण आणि ओढ. वेदांताचा पुरस्कार करणाऱ्या स्वामीचे व्यक्तिमत्त्व आणि कालीमठातील वातावरण याबद्दल सुरुवातीला नाराज असणारा राजशेखर हळूहळू कालीमठाकडे ओढला जातो आणि कौटुंबिक पाश तोडून एक दिवस स्वामींचा शिष्य बनून कालीमठात वास्तव्य करू लागतो. एका आईचा तेजस्वी मुलगा, हुशार आणि चिकित्सक विद्यार्थी, एक होतकरू तरुण ते कालीमठाचा, स्वामींचा शिष्य, एक अमयसाधक, बंडखोर आणि तर्कनिष्ठ अभ्यासक, प्रतिभावान संन्यासी, अमोघ वक्ता या मार्गावर होणारा राजशेखरचा प्रवास

साधा पाव हा ठीक असतो; त्यावर जेव्हा लोणी लावण्याचा प्रसंग येतो तेव्हा मोहाला बळी पडावे लागते. - डी. जेरॉल्ड

खरोखरच मुळातूनच वाचण्यासारखा आहे. साधकाला लागणारी चिकित्सक वृत्ती, मर्यादित पण बंडखोर वृत्ती आणि सर्वसमावेशक दृष्टी हे सगळे राजशेखरला अवगत असतेच; पण त्याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रश्न उपस्थित करण्याची आणि प्रश्नांचा पाठपुरावा करण्याची चिकाटी या गुणांमुळे राजशेखरची तत्त्वचिंतनाच्या क्षेत्रात खूप थोड्या काळात प्रगती होते आणि या प्रवासात त्याचे मार्गदर्शक असतात अद्वैताचे उपासक कालीमठाचे स्वामी, राज्यपालपदासारख्या उच्चस्थानी असणारे 'लोकायत' तत्त्वज्ञानाचे अभ्यासक प्रो. हरिप्रसाद चट्टोपाध्याय. जडवाद खरा की चेतनावाद? भारतीय परंपरेत शंकराचार्यांनंतर मुलभूत तत्त्वचिंतन का थांबले? साक्षात्कार म्हणजे काय? तो कसा होतो? बुद्ध खरा की शांकरदेवांत? अशा असंख्य प्रश्नांची उत्तरे मिळवण्यासाठी धडपडणाऱ्या राजशेखरला या प्रवासात इला ही जर्मन अभ्यासक स्त्री भेटते आणि तिच्या बुद्धिवैभवापुढे आणि तर्कनिष्ठेमुळे आचार्य झालेला राजशेखर शेवटी अंतर्मुख होतो आणि तिच्या सहवासात स्वतःचे संन्याशीपण पणाला लावत 'शेवटी ईश्वर काय आणि नीती काय या बाबीही अखेर माणसांनीच निर्माण केल्या आहेत ना !'' असा मनाचा कौल घेऊन स्वतःला एक नवी संधी देतो. इथे ही कादंबरी संपते.

वरवर पाहता, एका सामान्य मुलाचा एक अभ्यासक संन्याशी आणि तात्विक गुरू होण्यापर्यंतचा रोमांचक प्रवास म्हणजे ही कादंबरी असे वाटत असले तरी यात घडणाऱ्या प्रत्येक प्रसंगाला गंभीर तत्त्वचिंतनाची किनार आहे. एक साधक या नात्याने राजशेखर एक गंभीर 'प्रश्नायन' आपल्यापुढे उभे करतो आणि तत्त्वचर्चा, देशाटन, श्रवण-मनन या मार्गांनी सापडतील तशी उत्तरेही गोळा करतो. या प्रवासात तो अडखळतो, धडपडतो आणि एक वाचक म्हणून आपणही राजशेखरशी एकरूप होतो. त्याच्या शंका, प्रश्न, अडचणी, संभ्रम आपले होऊन जातात आणि आचार्य झालेला राजशेखर त्याच्या प्रवचनांतून त्याचे विवेचन मांडतो तेव्हा काहीतरी गवसल्याचा, सापडल्याचा आनंद आपल्यालाही होतो. कालीमठाचा उत्कर्ष, सोसायटी ऑफ एशियन थिंकर्स या संस्थेची जपानी उद्योगपती सामुराई यांनी केलेली स्थापना, राखालबरोबर राजशेखरचे असणारे निःस्पृह मैत्र, हरिदांचा राजशेखरला लाभलेला आशीर्वाद, देशाटनात राजशेखरला आलेले हृद्य अनुभव हे या कादंबरीतले हळवे कप्पे. यात आपण हरवून जातो आणि यात प्रकर्षाने जाणवते ती एकच गोष्ट - 'राजशेखरची चिकाटी, प्रश्न उपस्थित करण्याची, त्यांचा पाठपुरावा करण्याची जिज्ञासूवृत्ती.' तौलनिक धर्मशास्त्र, धर्म आणि विज्ञान, साक्षात्कार, तत्त्वचिंतनाचे वर्तमान, सामाजिक परिस्थिती, जपानी शिंतो, बहुदाचे निर्वाण या आणि अशा असंख्य विषयांवर बहुमोल विवेचनाची पखरण या कादंबरीमध्ये आहे. पण तरी हे विवेचन कुठेही रूक्ष, बोजड होणार नाही ही काळजी लेखकाने घेतली आहे. तत्त्वचिंतनपर असली तरी कादंबरी या साहित्यप्रकाराचा बाज कुठेही हरवणार नाही अशी दक्षता लेखकाने घेतली आहे. तत्त्वचर्चा आणि घटना-प्रसंगाचा क्रम यांचा योग्य समतोल कादंबरीत दिसून येतो. राजशेखरच्या तोंडून लेखकाने अनेक परखड पण सामाजिक, वैश्विक सत्ये वदवून घेतली आहेत. यातून दिसते ती लेखकाची वैचारिक स्पष्टता आणि अभ्यासू वृत्ती. धर्म - नीती, यांच्या जंजाळात न अडकता मुक्तपणे जीवनाचा आस्वाद घेऊ पाहणाऱ्या आणि संकुचितपणाकडे झुकणाऱ्या आजच्या 'व्यक्तिवादी' समाजाला मुलभूत परंतू तरीही अपरिहार्य प्रश्नांचा विचार करायला लावणारे हे कादंबरीस्वरूप 'प्रश्नायन' खूप मोलाचे विचारधन देऊन जाते. प्रत्येक सूज्ञ व्यक्तीने जपावी अशी ही अक्षर-भेट आहे. हा मोलाचा ठेवा समजेल अशा सोप्या, सुटसुटीत भाषेत मार्मिकपणे आपल्याला उपलब्ध करून दिल्याबद्दल द्वादशीवारांचे अभिनंदन आणि आभार.

**- अपर्णा कुलकर्णी**
सेंट सेवियर्स कॉलेज, मुंबई - ०१
मो. ९४२०४२२१८२

# गुप्तकालीन भारत : प्राचीन भारतातील 'सुवर्णयुग'
## भाग : १

*प्राचीन काळात इसवीसनाच्या ४ थ्या व ५ व्या शतकात भारतावर राज्य करणाऱ्या सुप्रसिद्ध 'गुप्त' घराण्याविषयी व त्यांच्या राज्यकारभाराविषयी विस्तृत माहिती देणारा लेख क्रमशः छापत आहोत - संपादक*

प्राचीन काळात भारतामध्ये अनेक महान राजघराणी होऊन गेली. त्यापैकी एक म्हणजे गुप्त राजघराणे होय. ह्या राजघराण्याने इसवीसनाच्या सुमारे ४ थ्या शतकात एका विशाल साम्राज्याची स्थापना केली होती. गुप्त घराण्याच्या कार्यकालाला प्राचीन भारतातील 'सुवर्णयुग' असे संबोधले जाते. ह्या राजघराण्यात पहिला चंद्रगुप्त, समुद्रगुप्त, दुसरा चंद्रगुप्त इत्यादी महान सम्राट होऊन गेले. प्रसिद्ध इंग्रज इतिहासकार व्ही. ए. स्मिथ यांनी तर समुद्रगुप्ताचा उल्लेख 'भारताचा नेपोलियन' असा केला आहे. समुद्रगुप्ताच्या कारकीर्दीचा अभ्यास केल्यावर ही तुलना रास्तच आहे याचा प्रत्यय येतो. याचे कारण म्हणजे १८ व्या शतकाचा अस्त होत असताना फ्रान्सचा शासक बनलेल्या नेपोलियनला युरोपच्या इतिहासातील एक महान सम्राट म्हटले जाते. नेपोलियन जसा त्याच्या यशस्वी लष्करी मोहिमांसाठी प्रसिद्ध आहे तसाच तो त्याच्या कुशल प्रशासनासाठी वा प्रशासकीय व्यवस्थेसाठी देखील प्रसिद्ध आहे. समुद्रगुप्त व प्रामुख्याने त्याचा पुत्र व वारस दुसऱ्या चंद्रगुप्ताने त्याकाळात उत्तम प्रशासकीय व्यवस्था निर्माण केली होती यात वाद नाही.

गुप्तांविषयीचे उल्लेख आपणास शुंग व कुशाण घराण्यांच्या काळापासून मिळण्यास सुरुवात होते. परंतु शुंग व कुशाण घराण्यांच्या काळात ज्या गुप्त घराण्यांचा उल्लेख येतो त्यांचा ४ थ्या शतकात उत्तर भारतात सत्ता प्रस्थापित करणाऱ्या गुप्तांशी काही संबंध होता की नाही याविषयी इतिहासकारांमध्ये दुमत आहे.

अनेक इतिहासकार श्रीगुप्त, घटोत्कच व पहिला चंद्रगुप्त हे गुप्त घराण्यातील पहिले तीन राजे होते असे म्हणतात. ह्यापैकी श्रीगुप्त व घटोत्कच यांनी 'महाराज' तर पहिल्या चंद्रगुप्ताने 'महाराजाधिराज' अशी पदवी धारण केलेली आढळते. त्यामुळे बहुतांशी इतिहासकारांचे म्हणणे आहे की, श्रीगुप्त व घटोत्कच हे लहानशा राज्याचे राजे असावेत व पहिल्या चंद्रगुप्ताच्या काळापासून खऱ्या अर्थाने गुप्त साम्राज्याचा विस्तार होण्यास सुरुवात झाली असावी. त्यामुळेच त्याने 'महाराजाधिराज' हा किताब वा पदवी घेतली असावी. गुप्तांच्या कालावधीविषयी म्हणजेच नेमके एक प्रबळ राजघराणे म्हणून त्यांचा उदय होण्याची सुरुवात इसवीसनाच्या ३ऱ्या शतकापासूनच झाली का, याबाबतीतसुद्धा इतिहासकारांमध्ये एकमत नाही. असे असले तरी, इतिहासकारांचा एक मोठा गट असे मानतो की, 'गुप्त' राजघराणे इसवीसनाच्या ३ऱ्या शतकापासूनच प्राचीन भारताच्या राजकीय पटलावर खऱ्या अर्थाने पुढे येऊ लागले.

आपणास गुप्त राजघराण्याची माहिती अनेक लिखित साधनांतून तसेच विविध गुप्त राजांनी पाडलेल्या नाण्यांच्या मदतीने मिळते. साहित्यिक साधनांमध्ये पुराणं, व्यास स्मृती, हरीत स्मृती, पितामह स्मृती, पुलस्त्य स्मृती, पहिल्या चंद्रगुप्ताचा प्रधान शिखर लिखित 'कामंदक नीतिसार', अनेक संस्कृत काव्यं व नाटकं इत्यादींचा समावेश आवर्जून करावा लागेल. नाटकांमध्ये विशाखादत्त लिखित 'देवी चंद्रगुप्तम' व 'मुद्राराक्षस' ह्या नाटकांचा उल्लेख करावा लागेल. ह्या दोन नाटकांच्या तपशीलातून आपणास गुप्तांच्या काळाविषयी मोठ्या

प्रमाणात माहिती मिळण्यास मदत होते. या दोन नाटकांपैकी 'मुद्राराक्षस' ह्या नाटकाचा आशय चंद्रगुप्त मौर्य व मौर्य राजघराण्याची स्थापना असा असला तरी ह्या नाटकातून गुप्त राजघराण्याविषयी देखील माहिती मिळविण्यासाठी होतो असे इतिहासकारांचे व अभ्यासकांचे मत आहे. 'मुद्राराक्षस' या नाटकाच्या आधारे आपणास अशी माहिती मिळते की, गुप्त राजांच्या काळात हिंदू धर्माचे पुनर्ज्जीवन होण्यास मदत झाली होती व त्याकाळात लोक मोठ्या प्रमाणात विष्णूची पूजा करीत असत. विष्णूच्या वराह अवताराची पूजादेखील त्याकाळात मोठ्या प्रमाणात प्रचलित होती असे संदर्भ आपणास आढळतात. त्याचप्रमाणे पहिल्या चंद्रगुप्ताच्या काळात शक, यवन, किरट, कंबोज, भालिक, गंधार इत्यादी वंशांचे वा विविध टोळ्यांचे लोक भारतात राहात असत अशीदेखील माहिती आपणास 'मुद्राराक्षस' ह्या नाटकावरून मिळते.

वरील भारतीय साधनांव्यतिरिक्त फा-हियान (Fa-Hien) तसेच ई-त्सिंग (I-Tsing) ह्या चीनी बौद्ध भिक्कूंनी त्यांच्या भारतभेटीविषयी लिहून ठेवलेल्या तपशीलाच्या आधारेसुद्धा आपणास गुप्त राजघराण्याविषयी माहिती मिळण्यासाठी मदत होते.

समुद्रगुप्त, दुसरा चंद्रगुप्त, पहिला कुमारगुप्त आदी गुप्त राजांनी पाडलेल्या विविध प्रकारच्या नाण्यांवरून देखील आपणास ह्या राजघराण्याविषयी व त्यांच्या काळातील एकंदरीतच राजकीय, सामाजिक व आर्थिक जीवनाविषयी माहिती मिळविण्यासाठी मदत होते. ह्या काळातील नाण्यांवर राजाला धनुष्याला बाण लावलेल्या अवस्थेत वाघाची शिकार करताना, तसेच अश्वमेध यज्ञ करत असताना दाखविलेले आढळते.

कुशाण राजघराण्याचा अस्त झाल्यानंतर गुप्तांच्या राजघराण्याचा उदय होईपर्यंत उत्तर भारतात ऐछत्र, अयोध्या, कौसंबी इत्यादी राज्ये तसेच नाग, वकाटक, मुखरी व गुप्त ह्या राज्यवंशांची छोटी राज्ये अस्तित्वात होती. ह्यापैकी नागवंशीय राजांचे राज्य विदिशा, कांतीपुरी, मधुरा व पद्मावती या प्रदेशांवर होते अशी माहिती आपणास पुराणांच्या आधारे मिळते. विदिशावर राज्य करणाऱ्या काही नागवंशीय राजांची नावे शिश, भोगीन व सदाचंद्र चंद्रांश अशी होती. गुप्त वंशातील समुद्रगुप्त ह्या राजाने गणपतीनाग व नागसेन ह्या दोन नागवंशीय राजांचा पराभव वा पाडाव केला होता. त्याचप्रमाणे समुद्रगुप्ताने आपला पुत्र दुसरा चंद्रगुप्त याचा विवाह नागवंशीय राजकन्या कुवेरनाग हिच्यासोबत लावून दिला होता अशी माहिती आपणास सापडते.

येथे एक महत्त्वाचा मुद्दा नमूद करणे आवश्यक आहे व तो मुद्दा म्हणजे गुप्त घराण्यातील सर्वात प्रसिद्ध असलेल्या समुद्रगुप्त ह्या राजाविषयीची माहिती आपणास अलाहाबाद येथील स्तंभलेखावरून मिळते. हा स्तंभलेख अलाहाबाद येथील किल्ल्यात असून तो सुरुवातीस कौसंबी या ठिकाणी होता व हा स्तंभ मुळात प्रसिद्ध मौर्य सम्राट अशोकाचा स्तंभ होता. ह्या मूळच्या अशोकस्तंभावर समुद्रगुप्ताच्या दरबारातील विद्वान कवी हरीसेन याने समुद्रगुप्ताचे गुणगाण गाणारा (प्रशस्ती) लेख कोरवून घेतला होता. हरीसेन हा समुद्रगुप्ताच्या दरबारातील मंत्रीसुद्धा होता. आपणास ह्या अलाहाबाद स्तंभलेखावरून समुद्रगुप्ताच्या कारकीर्दीविषयी विस्तृत माहिती मिळते. अलाहाबादच्या स्तंभलेखाप्रमाणेच उदयगिरीतील गुहालेख, मथुरेतील शिलालेख, सांची येथील शिलालेख, गढवा येथील शिलालेख, बिलसाडचा शिलालेख, जुनागढ़चा शिलालेख, इंदौर येथे सापडलेला ताम्रपट इत्यादी लेखांपासून दुसरा चंद्रगुप्त, पहिला कुमारगुप्त, स्कंदगुप्त आदी गुप्त सम्राटांविषयीची माहिती मिळते.

गुप्त राजघराण्यातील पहिला राजा कोण असावा याविषयी इतिहासकारांमध्ये दुमत असले तरी, बऱ्याच

जर डोळ्यांत अश्रू नसतील, तर आत्म्याला इंद्रधनूचा लाभ होणार नाही. - जे. व्ही. चेने

अभ्यासकांचे असे मत आहे की, श्रीगुप्त (कार्यकाल सुमारे इसवीसन २४० ते इसवीसन २८०) हा गुप्त राजघराण्याचा पहिला राजा होय. घटोत्कच हा श्रीगुप्तचा पुत्र व त्याचा वारस होता असे अनेक इतिहासकार मानतात. श्रीगुप्त व घटोत्कच यांचा उल्लेख 'महाराज' या पदवीने केलेला आपल्या निदर्शनास येतो. घटोत्कचानंतर पहिला चंद्रगुप्त हा गुप्तांच्या राज्याचा राजा बनला व अगोदर नमूद केल्याप्रमाणे ह्याचा उल्लेख 'महाराजाधिराज' या किताबाने केलेला आढळतो. त्यामुळे ह्याचे कर्तृत्व श्रीगुप्त व घटोत्कच यांच्यापेक्षा श्रेष्ठ असावे असे मत अनेक इतिहासकार मांडतात.

पहिल्या चंद्रगुप्ताचा विवाह लिच्छवी राजकन्या कुमारदेवी हिच्यासोबत झाला होता असे दाखले आपणास मिळतात. लिच्छवींचे राज्य प्रामुख्याने नेपाळमध्ये होते व सध्याच्या बिहार तसेच उत्तर प्रदेशच्या पूर्वेकडील नेपाळच्या सीमेलगत असलेल्या प्रदेशांमध्ये देखील लिच्छवींचे राज्य होते असे इतिहासकार म्हणतात. काही अभ्यासकांच्या मते लिच्छवी हे उच्चकुलीन क्षत्रिय होते तर काहींच्या मते त्यांचे क्षत्रिय कुळ श्रेष्ठ दर्जाचे नव्हते. काहीही असले तरी, लिच्छवी राजकन्येसोबतच्या विवाहाला गुप्त राजघराण्याच्या दृष्टीने फार महत्त्व होते यात वाद नाही. याचे कारण लिच्छवी राजकन्येसोबत पहिल्या चंद्रगुप्ताचा विवाह झाल्यानंतर त्यांच्या मदतीने गुप्तांनी आपला साम्राज्य विस्तार केला असावा वा तो साम्राज्यविस्तार करण्यात लिच्छवींचा गुप्तांना फार उपयोग झाला असावा असे अभ्यासकांचे मत आहे.

गुप्त राजघराण्यातील सर्वात प्रसिद्ध राजा वा सम्राट समुद्रगुप्त होता असे म्हणणे वावगे ठरू नये. समुद्रगुप्त हा पहिल्या चंद्रगुप्ताला त्याची लिच्छवी वंशातील राणी कुमारदेवी हिच्यापासून झालेला पुत्र होता. अलाहाबाद येथे सापडलेल्या स्तंभलेखावरून आपणास माहिती मिळते की, पहिल्या चंद्रगुप्ताने भर दरबारात समुद्रगुप्ताला आपला राजकीय उत्तराधिकारी म्हणून घोषीत केले होते. ह्या स्तंभलेखातील प्रशस्तीमध्ये असेही वर्णन आले आहे की, जेव्हा पहिल्या चंद्रगुप्ताने समुद्रगुप्त हा गुप्त राजघराण्यातील पुढचा सम्राट वा राजा असेल अशी घोषणा केली, तेव्हा दरबारात उपस्थित असलेल्या अनेकांनी जल्लोष करून ह्या घोषणेचे स्वागत केले होते. परंतु त्याचबरोबर समुद्रगुप्ताने राजा बनणे हे दरबारातील काही मंडळींना रुचले नव्हते अशी माहितीदेखील ह्या प्रशस्तीतून मिळते. इतिहासकारांच्या मते, समुद्रगुप्ताने त्याला असलेला थोडाफार विरोध मोडून काढून स्वतःचे सिंहासन व पद बळकट केले होते.

समुद्रगुप्ताच्या कारकीर्दीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याने लढलेल्या अनेक लढाया व मोठ्या प्रमाणात केलेला साम्राज्यविस्तार होय. अलाहाबाद येथील प्रशस्तीमध्ये लेखकाने म्हणजेच हरीसेनाने, समुद्रगुप्ताने कशाप्रमाणे शंभर लढायांमध्ये आपले युद्धकौशल्य दाखवले व लढायांमध्ये लढताना त्याच्या शरीरावर झालेल्या जखमा व त्याचे व्रण याचेदेखील वर्णन केले आहे. उत्तर भारतामध्ये समुद्रगुप्ताने अनेक राजांचा पाडाव केला होता. त्यापैकी नऊ जणांची नावे आपणास खात्रीने उपलब्ध आहेत. हे नऊ राजे म्हणजे नाग वंशातील नागसेन व गणपती नाग, नागवंशीय नसलेले अच्युत व चंद्रवर्मन तसेच ह्याव्यतिरिक्त रुद्रदेव, मतील, नागदत्त, नंदी व बालवर्मन हे होत. ह्यापैकी नागसेन व गणपतीनाग यांनी पद्मावती (आधुनिक मध्यप्रदेशातील ग्वाल्हेर ह्या ठिकाणाच्या साधारणपणे इशान्येकडे), विदिशा व मथुरा येथे आपल्या राज्यांची स्थापना केली होती. अच्युत व चंद्रवर्मन यांचे अनुक्रमे ऐच्छत्र (आधुनिक उत्तर प्रदेशातील बरेली जवळ) व पश्चिम बंगाल (बांकुरा जिल्ह्यामध्ये) येथे राज्य होते. इतर पाच राजांच्या राज्याविषयी आपणास खात्रीलायक माहिती मिळत नाही. समुद्रगुप्ताला

समतात (आग्नेय बंगाल), कामरूप (आसाम) व नेपाळचे राजे कर व नजराणा देत असत व ते समुद्रगुप्ताच्या आज्ञा पाळत असत अशी देखील माहिती प्राप्त होते. याचा अर्थ ह्या प्रदेशांच्या राजांनी समुद्रगुप्ताचे मांडलिकत्व पत्करले होते असा होतो. ह्या राज्यांसोबतच दावक (साधारणपणे आसाम मधील नोगोंग जिल्हा), कार्तीपूर (पंजाबमधील जालंधर जिल्ह्यातील करतारपूर–काहींच्या मते कार्तीपूर म्हणजे आधुनिक उत्तराखंडामधील कुमाऊँ, गढ़वाल व उत्तर प्रदेशातील उत्तरेकडील रोहीलखंड हे भाग होत) यांचादेखील समुद्रगुप्ताचे मांडलिकत्व पत्करलेल्या राज्यांमध्ये समावेश होतो. समतात, कामरूप, नेपाळ, दावक व कार्तीपूर ही पाच राज्ये समुद्रगुप्ताच्या साम्राज्याच्या सरहद्दीवर वा सीमांलगत वसलेली होती असे इतिहासकार म्हणतात. यावरून आपणास समुद्रगुप्ताच्या साम्राज्याची व्याप्ती लक्षात येते. ह्यासोबतच माळव, अर्जुनायक, यौद्धेह व माद्रक ह्यांचे राज्य असलेल्या प्रदेशांनीसुद्धा समुद्रगुप्ताचे मांडलिकत्व पत्करले होते असे इतिहासकारांचे मत आहे. समुद्रगुप्ताचे प्रत्यक्ष नियंत्रण असलेला भाग पूर्वेकडे बंगालपर्यंत (अती आग्नेयकडील काही भाग वगळून), उत्तरेकडे हिमालयाच्या पायथ्यापर्यंत, पश्चिमेकडे लाहोर व कर्नाल, कर्नालपासून यमुना व चंबल नद्यांच्या संगमापर्यंत, तर दक्षिणेकडे भिलसा व जबलपूरपर्यंत ते विंध्य पर्वताच्या पायथ्यापर्यंत होता असे म्हटले जाते.

वरील विवेचनावरून आपल्या लक्षात येते की, समुद्रगुप्ताने उत्तर भारतावर आपले स्वामित्व प्रस्थापित केले होते व तो त्याकाळातील एक एकमेवाद्वितीय योद्धा होता. मौर्यांनंतर उत्तर भारतातील बऱ्याचशा भागावर नियंत्रण प्रस्थापित करण्यात यशस्वी झालेला राजा म्हणजे समुद्रगुप्त होय यात वाद नाही. समुद्रगुप्ताने उत्तर भारतात गुप्तांच्या साम्राज्याचा विस्तार तर केलाच परंतु त्याने दख्खन व दक्षिण भारतातील अनेक राज्यांवर व शासकांवर आपले प्रभूत्व प्रस्थापित केले होते. इतिहासकार म्हणतात की, समुद्रगुप्ताने एकापेक्षा जास्त वेळा दख्खन व दक्षिण भारतावर आक्रमणं करून तेथील राजांना मांडलिक बनवले होते. काही इतिहासकार म्हणतात, समुद्रगुप्ताने दख्खन व दक्षिणेत एकंदरीत बारा राजांचा पराभव वा पाडाव केला होता. ह्या राजांची नावे पुढीलप्रमाणे आहेत – कोसलचा महेंद्र (दुर्ग, रामपूर, बिलासपूर – आधुनिक छत्तीसगड राज्यातील जिल्हे – तसेच संबलपूर), महाकांतारचा व्याघ्रराज (ह्याचे राज्य आधुनिक ओडिशा राज्यातील डोंगराळ भागात असावे असे तज्ज्ञांचे मत आहे), पिष्ठपूरचा महेंद्रगिरी (हे पिष्ठपूर म्हणजे आंध्र प्रदेशामधील पूर्व गोदावरी जिल्ह्यातील पिठापूरम हे ठिकाण असावे असा कयास आहे), वेंगीचा हस्तीवर्मन (हे ठिकाण आंध्र प्रदेशामधील कृष्णा व गोदावरी जिल्ह्यांच्यामध्ये एल्लोर या ठिकाणाच्या सात मैल उत्तरेला असावे असे इतिहासकार मानतात), पालक्काचा उग्रसेन (आंध्र प्रदेश राज्यातील नेल्लोर जिल्हा), कांचीचा (कांजीवरम्) पल्लव वंशातील राजा विष्णूगोप, एरांडपल्लाचा राजा दमन व देवराष्ट्रचा राजा कुबेर (ह्या दोन राजांचा प्रदेश आधुनिक आंध्र प्रदेशातील विशाखापट्टनम् ह्या जिल्ह्यात असावा असे मत अनेक इतिहासकारांनी व्यक्त केले आहे. परंतु काही इतिहासकांचे म्हणणे आहे की, एरांडपल्ला व देवराष्ट्र ही ठिकाणे महाराष्ट्रात होती. मात्र, एरांडपल्ला व देवराष्ट्र ही ठिकाणे महाराष्ट्रात नसून ती अनुक्रमे ओडिशातील गंजाम जिल्ह्यात व आंध्र प्रदेशातील विशाखापट्टनम् जिल्ह्यात होती असे मत बहुसंख्य इतिहासकारांनी व अभ्यासकांनी मान्य केले आहे. समुद्रगुप्त दख्खन व दक्षिणेतून उत्तर भारतात परतताना महाराष्ट्रातून परतला हे मतदेखील आता बऱ्याच इतिहासकारांना मान्य नाही). दक्षिणेत समुद्रगुप्ताने पराभूत केलेल्या इतर चार राजांची नावे कौरालचा मंतराज, कोट्टूराचा स्वामीदत्त, अवमुक्तचा निलराज व

कुस्थलपूरचा धनंजय अशी होत. अशाप्रकारे समुद्रगुप्ताने भारताच्या पूर्व समुद्र किनाऱ्यालगत वसलेल्या दख्खन व दक्षिणेतील अनेक राज्यांच्या राजांचा पराभव केला होता असे निदर्शनास येते. परंतु समुद्रगुप्ताने ह्या दक्षिणेकडील पराभूत राजांच्याबाबतीत एक राजकीय शहाणपण दाखविलेले आढळते व हे शहाणपण म्हणजे त्याने ह्या राजांचे राज्य आपल्या ताब्यात न घेता त्यांना आपले मांडलिकत्व पत्करण्यास भाग पाडले. समुद्रगुप्ताच्या ह्या निर्णयामुळे गुप्तांचा फार मोठा फायदा झाला. एक तर दक्षिणेतील राजांनी समुद्रगुप्ताचे म्हणजेच गुप्तांचे स्वामित्व पत्करले व त्यांची भविष्यात गुप्तांविरुद्ध बंड करण्याची शक्यता नष्ट पावली.

समुद्रगुप्ताने पश्चिम भारतावर म्हणजेच गुजराथ, कठियावाड व सिंधवर राज्य करणाऱ्या शक वंशीय राजांनादेखील आपले स्वामित्व पत्करण्यास भाग पाडले होते असे अनेक अभ्यासक म्हणतात. एवढेच नव्हे तर पश्चिम पंजाब व अफगाणिस्तानावर राज्य करणाऱ्या कुशाण वंशीय राजांनीसुद्धा समुद्रगुप्ताचे वर्चस्व मान्य केले होते असे अभ्यासकांचे मत आहे.

समुद्रगुप्ताने संपूर्ण भारतवर्षात आपला एवढा दबदबा निर्माण केला होता की, त्याचा परिणाम म्हणून सिलोन (सध्याचा श्रीलंका हा देश) व हिंदमहासागरातील इतर बेटरुपी देशांनीसुद्धा समुद्रगुप्तासोबत सौहार्दाचे संबंध ठेवणे उचित समजले होते. आपल्याला एका चीनी ग्रंथावरून अशी माहिती मिळते की, सिलोनचा राजा मेघवर्ण (इसवीसन सुमारे ३५२-३७९) ह्याने भारतातील बोधगया ह्या बौद्ध धर्मियांच्या पवित्र ठिकाणाला भेट देण्यासाठी सिलोनमधील दोन बौद्ध भिक्कूंना पाठवले होते. त्यावेळी ह्या भिक्कूंची भारतात राहण्याची व्यवस्थित सोय झाली नव्हती. त्यामुळे भविष्यात बोधगया येथे येणाऱ्या बौद्ध भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून मेघवर्णने त्याठिकाणी बौद्धविहार बांधण्याचा निर्णय घेतला व त्याप्रकारचा प्रस्ताव त्याने समुद्रगुप्ताकडे पाठवला. सोबतच त्याने समुद्रगुप्तासाठी उंची नजराणादेखील भेट म्हणून पाठवला होता. समुद्रगुप्ताने मेघवर्णच्या भेटीचा स्वीकार केला व त्याला बोधगयेत यात्रेकरूंसाठी विहार बांधण्याची अनुमतीदेखील दिली. त्यामुळेच मेघवर्ण बोधगयेत बोधीवृक्षाच्या उत्तरेला एक भव्य विहार बांधू शकला. नंतरच्या काळात (हर्षवर्धनाच्या काळात) जेव्हा युवान श्वांग (Hiuen Tsang) हा चीनी बौद्ध भिक्कू बोधगयेला आला तेव्हा ह्या विहारात एक हजारांहून जास्त बौद्ध भिक्कू होते अशी माहिती आपणास मिळते.

अगोदर नमूद केल्याप्रमाणे समुद्रगुप्ताने प्राचीन काळात एका विशाल साम्राज्याची स्थापना केली होती. समुद्रगुप्ताने केलेल्या लढाया व अलाहाबाद येथील स्तंभलेखाद्वारे मिळालेल्या माहितीनुसार आपण असे म्हणू शकतो की, त्याच्या साम्राज्यात उत्तर भारतात काश्मीर, पश्चिम पंजाब, पश्चिम राजपुताना, सिंध, गुजराथ वगळता उत्तर भारताचा सर्व भाग तसेच छत्तीसगड व ओरिसाचा बऱ्याचशा भागांचा समावेश होता. अर्थात, हे भाग त्याच्या थेट नियंत्रणाखाली होते. या व्यतिरिक्त वायव्य, पश्चिम व दक्षिण भारतातील अनेक राजांनी वा राजवंशांनी त्याचे मांडलिकत्व पत्करले होते हे आपण पाहिलेलेच आहे.

(क्रमशः)

(टीप : हा लेख प्रदीर्घ असल्यामुळे तो क्रमशः छापला जाईल. ह्या लेखाचा भाग पहिला छापत आहोत.)

**- सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email :subhashinscotland@gmail.com

•••

तारुण्यात आपण दुःख नसताना अश्रू गाळत असतो, तर वार्धक्यात अश्रू न गाळता दुःखे सहन करत असतो!- जोसेफ रॉक्स

# परिसर वार्ता

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

**कोकण विभाग आयोजित आंतरशालेय व आंतर महाविद्यालयीन 'कथाकथन' स्पर्धेचा निकाल :**

वेदान्ती हिन्दुराव हिला तृतीय क्रमांक मिळाला.

**ठाणे नगर वाचन मंदिर आयोजित निबंध स्पर्धेचा निकाल:**

**संक्षिप्त निकाल :**

| इ. | विद्यार्थ्याचे नाव | पारितोषिक |
|---|---|---|
| ६ वी | निहारिका मोरे | द्वितीय |
| ९ वी | धनश्री पवार | द्वितीय |
| ९ वी | आदिती पेंडसे | द्वितीय |
| ८ वी | रमा राईलकर | उत्तेजनार्थ |

## जोशी-बेडेकर महाविद्यालय

**वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमाला पुष्प ९ वे**




वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमालेचे ९ वे पुष्प ज्येष्ठ अर्थशास्त्रज्ञ डॉ. संतोष दास्ताने यांनी गुंफले. 'भारतीय कृषीक्षेत्र समज व वास्तव' या विषयावर त्यांनी व्याख्यान दिले. भारतातील कृषीक्षेत्राची सद्यस्थिती, कृषीप्रधान अर्थव्यवस्था, कर्जमाफी, शेतकऱ्यांची सद्यस्थिती इत्यादी विषयांवर त्यांनी प्रकाश टाकला. स्वामिनाथन आयोगाची स्थापना व आयोगाच्या सूचनांबद्दलही डॉ. दास्ताने बोलले. महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमाला पुष्प १० वे**



वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमाला पुष्प १० वे संस्कृतचे ज्येष्ठ विद्वान व डेक्कन कॉलेजचे भूतपूर्व प्राध्यापक डॉ. प्रभाकर आपटे यांनी गुंफले. विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी डॉ. आपटे यांची मुलाखत घेतली. संस्कृतकोशग्रंथांवर तसेच डेक्कन कॉलेज, पुणे यांच्या संस्कृत कोशाच्या निर्मिती प्रक्रियेवर त्यांनी प्रकाश टाकला. भारतीय स्थापत्य शास्त्रावरील अनेक ग्रंथ व त्याचे समयौचित्य त्यांनी अधोरेखित केले. भारतातील अनेक मंदिरांच्या स्थापत्य शैली, संरचना आदी गोष्टींवर डॉ. आपटे यांनी प्रकाश टाकला. 'अपराजितपृच्छा' 'जयपृच्छा' 'समरांगणसूत्रधार' 'मयमतम्' या ग्रंथांवर डॉ. आपटे यांनी विवेचन केले. पुढच्या पीढीने संस्कृत ग्रंथांचं अध्ययन आधुनिकतेशी नाळ जोडत करावं; त्यातून स्थापत्य, आरोग्य, कोशशास्त्र, भाषाशास्त्र, अभियांत्रिकी आदी विषयांच्या परिप्रेक्ष्यात भारतीय ज्ञानपरंपरा ऊर्जस्वल होईल असं प्रतिपादन त्यांनी केलं.

अश्रू ही दुःखाची मूक भाषाच होय. - वोल्टेर

### वा. ना. बेडेकर स्मृतीव्याख्यानमालेचे ११ वे पुष्प




वा. ना. बेडेकर स्मृतीव्याख्यानमालेचे ११ वे पुष्प ज्येष्ठ पत्रकार श्री. राजू परुळेकर यांनी गुंफलं. 'पत्रकारिता-काल, आज व उद्या' या विषयावर त्यांनी व्याख्यान दिलं.

मराठी पत्रकारितेत उल्लेखनीय काम केलेल्या लोकमान्य टिळक, आगरकर, गांधी, आंबेडकर ते आधुनिक पत्रकारितेपर्यंत त्यांचा आवाका होता. महाविद्यालयाच्या वृत्तविद्या व संज्ञापनशास्त्र विभागातील पत्रकारितेचे धडे गिरवणाऱ्या विद्यार्थ्यांना श्री. राजू परूळेकरांनी आदर्श पत्रकारितेचा कानमंत्र दिला. पत्रकारिता ही फक्त स्वतःच्या प्रसिद्धीसाठी नसून निर्भिडपणे सत्याची मशाल तेवत ठेवण्यासाठी आहे असे ते म्हणाले. पत्रकारांनी चौफेर वाचन केलं पाहिजे. मात्र सोबतच त्याच्या मानवी जाणीवा तेवढ्याच व्यापक असाव्या असं ते म्हणाले.

### बी. एम. एम. विभागाचा 'भारतीय संस्कृती महोत्सव'

महाविद्यालयाच्या बी. एम. एम. विभागातर्फे २२ ऑगस्ट २०१७ रोजी एकदिवसीय सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. भारतातील प्रत्येक राज्याची वेशभूषा, संस्कृती, खाद्यसंस्कृती आदी विषयांवर विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले. सोबतच 'पोस्टर मेकिंग' स्पर्धा आयोजित करण्यात आली. विद्यार्थ्यांनी समायोचित व आधुनिक विषयांवर उत्कृष्ट भित्तीपत्रके बनवली. कार्यक्रमाप्रारंभी महाविद्यालयाच्या प्र. प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी आपलं मनोगत व्यक्त केलं. 'संस्कृती व नदी' यांचा संबंध जोडत 'नमामी गंगे' व 'नमामी ब्रह्मपुत्र' या दृक्‌श्राव्य चित्रफिती दाखवत डॉ. नाईकांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. कार्यक्रमास डॉ. महेश पाटील, सौ. संगीता दास, सौ. विमुक्ता राजे, प्रा. प्रशांत धर्माधिकारी व प्राध्यापकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होता.

### धडे नाट्याभिनयाचे

दि. २८ सप्टेंबर रोजी महाविद्यालयाच्या टॅलेंट ॲकॅडमी तर्फे 'धडे नाट्याभिनयाचे' या विषयावर कार्यशाळा संपन्न झाली. मराठी अभिनेता शेखर फडके तसेच बालरंगभूमीचे साक्षेपी दिग्दर्शक श्री. मंदार टिल्लू हे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना नाट्याभिनयाचे धडे दिले. या कार्यशाळेस विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### संस्कृत दिन

महाविद्यालयाच्या संस्कृत विभागातर्फे दि. २७ सप्टेंबर रोजी 'संस्कृतदिन समारोह' आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचं प्रास्ताविक प्र. प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या संस्कृतमधील भाषणाने झाले. कार्यक्रमास श्री. बोंद्रे हे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले. संस्कृत भाषेची समकालीन आवश्यकता या विषयावर त्यांनी व्याख्यान दिले. संस्कृत विभागाच्या विद्यार्थ्यांच्या विविध गुण प्रदर्शनाने कार्यक्रमाला रंगत आली. विभाग प्रमुख प्रा. स्वाती भालेराव यांनी कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले.

### फिल्म सोसायटी-चित्रपटाचे सादरीकरण

'जोशी-बेडेकर कॉलेज फिल्म सोसायटी'च्या वतीने ३ ऑक्टोबर रोजी 'The Man Who Knew Infinity' या चित्रपटाचे सादरीकरण झाले. ज्येष्ठ गणिती श्रीनिवास रामानुजन यांच्या जीवनावर आधारित असलेल्या या इंग्रजी चित्रपटाने विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाप्रती सजगता व प्रेरणा मिळाली. महाविद्यालयाच्या फिल्म सोयायटीचे

समन्वयक प्रा. प्रशांत धर्माधिकारी यांनी चित्रपटाच्या चित्रीकरणानंतर विद्यार्थ्यांशी चित्रपटासंदर्भात प्रश्नोत्तरांनी संवाद घडवून आणला. विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### Chrysalis 2017



महाविद्यालयाच्या विनाअनुदानित विभागातर्फे १६ सप्टेंबर रोजी ‘क्रिसलीस’ हा महोत्सव आयोजित करण्यात आला होता. यावेळी महोत्सवाचे ब्रीदवाक्य ‘Go Green - Go Smart’ असे होते. विद्यार्थ्यांनी स्वच्छतेचे धडे गिरवत निसर्गाप्रती सजगता दाखवली. महोत्सवाचे उद्घाटन ठाण्याचे अतिरिक्त आयुक्त श्री. सुनील चव्हाण यांच्या हस्ते झाले. श्री. चव्हाण यांनी ‘स्मार्ट सिटी’ या विषयावरील त्यांच्या अनुभवावर व्याख्यान दिले. महोत्सवाचे प्रास्ताविक महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी ‘SMART’ या शब्दाचा अर्थ सांगून त्याचा तात्विक आशय प्रतिपादीत केला. ‘परिसर स्वच्छता’ ‘यूट्यूबर्स मीट’ इत्यादी अत्यंत उपयुक्त कार्यक्रमांची रेलचेल या महोत्सवात पाहायला मिळाली. ‘स्मार्ट सिटीज्’ या विषयावर समाजात काम करणाऱ्या अनेक प्रथितयश व्यक्तिंनी ‘समूहचर्चा’ मध्ये सहभाग नोंदवला. महोत्सवाच्या प्रभावी व्यवस्थापनात प्रा. नेहा मालखरे व प्रा. देसाई यांनी मोठा वाटा उचलला.

### भोंडल्याचे आयोजन

महाविद्यालयातर्फे प्रथमच पारंपरिक भोंडल्याचे आयोजन करण्यात आले. महिलांच्या पारंपरिक भोंडला



या पारंपरिक कार्यक्रमास नवरात्रात अनन्यसाधारण महत्त्व आहे. या परंपरेचे महाविद्यालयीन पातळीवर पुनरुज्जीवन करण्याच्या ह्या प्रयोगाला महिला प्राध्यापिकांचा व विद्यार्थिनींचा चांगला प्रतिसाद लागला. प्र. प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनीही यात सहभाग नोंदवला.

### स्ट्रेस मॅनेजमेंट शिबिर

महाविद्यालयाच्या IQAC विभागातर्फे व Counselling Cell तर्फे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी निःशुल्क स्ट्रेस मॅनेजमेंटचे शिबिर आयोजित केले होते. अध्यापन व कार्यालयीन कामातून निर्माण होणारा ताण कोणत्या प्रकारे समायोजित करायचा यावर या कार्यशाळेत चर्चा झाली. सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना या शिबिराचा खूप फायदा झाला.

### महेश पाटील यांना डॉक्टरेट



जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या संज्ञापन व पत्रकारिता या विभागाचे समन्वयक प्रा. महेश मधुकर

पाटील यांना पुणे येथील टिळक महाराष्ट्र विद्यापीठातर्फे पीएच. डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. दीपक टिळक यांच्या मार्गदर्शनाखाली 'वृत्तपत्राच्या आर्थिक साक्षरता सुधारणेतील भूमिकेचा अभ्यास' या विषयामध्ये त्यांनी प्रबंध सादर केला. डॉ. पाटील यांनी पीएच. डी. पदवी मिळविल्याबद्दल महाविद्यालयाच्या प्र. प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

**वाचन प्रेरणा दिवसानिमित्त विद्या प्रसारक मंडळाच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात शासनाधिस्त 'वाचन जागर'**

भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या अनुषंगाने १५ ऑक्टोबर हा जन्मदिन 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून शासनाने घोषित केला आहे.

यानिमित्ताने १३ ऑक्टोबर २०१७ रोजी 'वाचन: ऐकावे आणि वाचावे' या विषयावर श्री. सुनिल सावंत, कु. वैदेही ओलतीकर, सौ. कविता बाळंखे व सौ. वैशाली कुलकर्णी यांचा कार्यक्रम महाविद्यालयाच्या पतंजली सभागृहात सकाळी १०.३० वाजता आयोजित करण्यात आला होता.

या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हिंदी विभागाचे प्रमुख श्री. अनील आठवले यांनी केले. यावेळी प्रा. प्रकाश माळी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. चारोळीच्या माध्यमातून त्यांनी वाचनाबद्दलचे विचार सर्वांसमोर मांडले.

यावेळी महाविद्यालयाचे उप-प्राचार्य प्रा. वेंकटरामन यांनी आपले मनोगत मांडताना वाचनाचे महत्त्व पटवून दिले.

या कार्यक्रमाची सुरवात श्री. सुनिल सावंत यांनी ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त कवी विंदा करंदीकर यांची कविता सादर करून केली. तसेच २००८ साली झालेल्या दहशदवादी हल्ल्यावरील कविता, सध्याच्या तंत्रज्ञानाच्या / गॅझेटच्या जगात जिंदगीच हरवली अशा कविता सादर केल्या. सौ. कविता बाळंखे यांनी कीर्तीचक्र प्राप्त मनिष कदम यांच्यावर लिहिलेल्या पुस्तकातील काही भागांचे वाचन केले. तसेच 'कार्ट प्रेमात पडलंय' ही कविता सादर केली. कु. वैदेही ओलतीकर हिने स्वतः लिहिलेले 'बंधन' लेखाचे वाचन केले. सौ. वैशाली कुलकर्णी यांनी 'तोत्तोचांद या पुस्तकातील काही भागांचे वाचन केले. तृतीय वर्ष विज्ञान शाखेत शिकत असलेल्या कु. अक्षय पाटील या विद्यार्थ्याने सर्वांसमोर 'वाचनाची गरज' यावर आपले विचार व्यक्त केले.

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या पुस्तकाचे व डॉ. कलाम यांच्या कार्याबाबत भित्तीपत्रिकांचे प्रदर्शन देखील भरवले होते. या कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन ग्रंथपाल सौ. कादंबरी मांजरेकर यांनी केले. शेवटी कार्यक्रमाची सांगता सामूहिक राष्ट्रगीताने झाली.

**बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात माजी पंतप्रधान इंदिरा गांधी पुण्यतिथी व लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल जयंती साजरी करण्यात आली.**

दिनांक ३१ ऑक्टोबर २०१७ रोजी माजी पंतप्रधान इंदिरा गांधी पुण्यतिथी व लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल जयंती निमित्त ग्रंथालयात इंदिरा गांधी व सरदार वल्लभभाई पटेल यांच्यावरील माहिती व ग्रंथालयातील पुस्तकांचे प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच त्यांच्या प्रतिमेस ३१ तारखेला सकाळी ११.०० वाजता महाविद्यालयीन कार्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी कार्यालयीन कर्मचार, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. महाविद्यालयाच्या ग्रंथपाल कादंबरी मांजरेकर यांनी कार्याबद्दल आढावा घेतला.

**बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात बालदिनाची त्रिवेणी पर्वणी**



बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयामध्ये १४ नोव्हेंबर बालदिन हा अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला.

मराठी विज्ञान परिषद आयोजित राज्यस्तरीय विज्ञान एकांकिका स्पर्धेत प्राथमिक फेरीत मुंबई विभागातून घेतलेल्या स्पर्धेत पदार्पण करून अकरावी विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांनी लेखन, दिग्दर्शन, अभिनय व संगीत असे 'सबकुछ ज्युनिअर' परिश्रम करून बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील या विद्यार्थ्यांनी प्राथमिक फेरीत आपली चुणूक दाखवली. 'एक शोकांकिका-निकोला टेसला' या शीर्षकाची ही एकांकिका निकोट टेसला या शास्त्रज्ञांची जीवन कहाणी व संशोधन प्रेक्षकांपुढे मांडण्याचा प्रयत्न करते.

दुसऱ्या एका वेगळ्या प्रकारच्या कार्यक्रमात म्हणजे भारतीय वायुसेना व वायुशक्ती यांच्यावतीने आयोजित मुलुंड मध्ये Air Force show व Aero modeling show चे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अकरावी विज्ञानाचे १०२ विद्यार्थी सहभाग झाले होते.

तसेच विद्या प्रसारक मंडळाच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभाग व कार्यालयीन विभागाद्वारे संयुक्तरित्या आयोजित बालदिनानिमित्त पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्मदिवस बालदिन म्हणून साजरा करताना त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला व त्यांच्या ऐतिहासिक कार्याचा गौरव करण्यात आला. यावेळी अकरावी विज्ञान शाखेचे विद्यार्थी, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

**बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात माजी पंतप्रधान इंदिरा गांधी जयंती साजरी करण्यात आली**



दिनांक १९ नोव्हेंबर २०१७ रोजी माजी पंतप्रधान इंदिरा गांधी जयंती निमित्त ग्रंथालयात यांच्यावरील माहिती व ग्रंथालयातील पुस्तकांच्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच त्यांच्या प्रतिमेस १९ नोव्हेंबर रोजी महाविद्यालयातील ग्रंथालयात श्रीमती श्रुती करमरकर, समंत्रक, वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन पदविका अभ्यासक्रम यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी ग्रंथालयीन कर्मचारी, वृत्तपत्रविद्या शिकणारे विद्यार्थी व महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या कार्याबद्दल माहिती दिली.

## महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर

महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे १२ वी विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी, अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेबद्दल व अभियांत्रिकीच्या विविध शाखांची

माहिती देणारे मार्गदर्शन शिबिर दिनांक ४ जून २०१७ रोजी चिपळूण व रत्नागिरी येथे एकाचवेळी आयोजित करण्यात आले होते. चिपळूणच्या युनायटेड न्यू इंग्लिश स्कूल येथील गुरुदक्षिणा सभागृहात तसेच रत्नागिरीतील गोगटे जोगळेकर महाविद्यालयातील राधाबाई शेट्ये सभागृहात हा कार्यक्रम संपन्न झाला. दोन्ही ठिकाणच्या मार्गदर्शन शिबिरात भाभा परमाणु अनुसंधान केंद्र (BARC) नवी मुंबईचे माजी शास्त्रज्ञ श्री. डॉ. सुधाकर आगरकर, डॉ. जयंती कुलकर्णी उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमात अभियांत्रिकी प्रवेशासाठी तंत्र शिक्षण संचालनालयाने ठरून दिलेल्या नियमांविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. अभियांत्रिकी शिक्षण कसे आहे? त्यातील विविध शाखांविषयीची माहिती व त्यांचे औद्योगिक क्षेत्रातील महत्त्व या मार्गदर्शनात सांगितले गेले. अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश घेताना विचारात घ्याव्या लागणाऱ्या विविध घटकांविषयाची माहिती तज्ज्ञांकडून दिली गेली.

महाविद्यालयाने दिनांक १४ जून ते २१ जून २०१७ या दरम्यान 'जागतिक योग सप्ताहा'चे औचित्य साधून दररोज सकाळी ९.१५ ते १०.१५ या एक तासाच्या कालावधीत महाविद्यालयातील भास्कराचार्य या शैक्षणिक संकुलात जागतिक योग सप्ताह साजरा केला. यासाठी महाविद्यालयातील मेकॅनिकल विभागाचे प्राध्यापक श्री. आनंद पतंगे यांनी योगासनातील common yoga practical's हे योगभ्यासाचे धडे या सप्ताहात दिले. तर प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागाचे सहाय्यक प्राध्यापक श्री. औदुंबर पाटकर यांनी प्रात्यक्षिकसह दैनंदिन जीवनातील योगाचे महत्त्व पटवून सांगितले. सदर योगाभ्यासाकरिता महाविद्यालयातील शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शविली होती. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ. शिल्पा कामत उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या शेवटच्या दिवशी डॉ. शिल्पा कामत यांनी 'प्राणायाम' यावर प्रात्यक्षिके करून दाखविली.

दिनांक १९ जून २०१७ रोजी भाजपचे राष्ट्रीय उपाध्यक्ष आणि राज्यसभेचे खा. विनय सहस्रबुद्धे यांनी महाविद्यालयाला भेट देवून येथील शैक्षणिक उपक्रमांची माहिती जाणून घेतली. यावेळी त्यांनी महाविद्यालयाच्या अभियांत्रिकी शिक्षणाच्या विविध कोर्सेस, विद्यार्थांना देण्यात येणारे शिक्षण, त्याचा दर्जा, सोयी सुविधा आदींची सविस्तर माहिती घेतली. तसेच पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या नावाने सुरू करण्यात आलेल्या कौशल्य विकास योजनेअंतर्गत सुरू असलेल्या अभ्यासक्रमाला मिळणाऱ्या प्रतिसादाबद्दलही माहिती जाणून घेतली. कोकणासारख्या अतिशय सुंदर निसर्गरम्य वातावरणात भगवान परशुरामाच्या पावन भूमीत उभारण्यात आलेल्या अभियांत्रिकी महाविद्यालयाचे अत्याधुनिक दालन भविष्यात देशातील शैक्षणिक दर्जा वाढविण्यात भरघोस हातभार लावेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

दिनांक २४ जून २०१७ रोजी एस. व्ही.जे. सी. टी, डेरवण महाविद्यालयातील प्राचार्य श्री. कल्पेश जुवेकर व प्राध्यापक वर्ग यांनी महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी विभागाला भेट दिली. विद्युत अभियांत्रिकी विद्यार्थांनी विद्यापीठास सादर केलेले प्रकल्प यावेळी दाखविण्यात आले. महाविद्यालयातील सुसज्ज प्रयोगशाळा व इतर शैक्षणिक घटकांमुळे बारावीच्या विद्यार्थांसाठी हे महाविद्यालय उत्कृष्ट दर्जाचे आहे असे प्राचार्यांनी सांगितले. एस. व्ही. जे. सी. टी, डेरवण व महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर या दोन्ही महाविद्यालयांच्या समन्वयाने येणाऱ्या काळात अधिकाधिक शैक्षणिक उपक्रम घेण्यात येतील असे आश्वासन त्यांनी दिले.

ज्यांच्या जवळ मरण्याचे सामर्थ आहे, तेच खरे सुखी! - टेनिसन

महाविद्यालयातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राध्यापक तसेच प्रथम वर्ष विभाग प्रमुख डॉ. अमितकुमार तानाजीराव माने यांना दिनांक १७ जून २०१७ रोजी सोलापूर विद्यापीठाने 'फिजिक्स' (भौतिकशास्त्र) या क्षेत्रात डॉक्टरेट पदवी प्रदान केली. त्यांच्या संशोधनाचे शीर्षक Preparation of Polypyrrole - Tungsten Oxide Hybride Nanocomposite Based Gas Sensors" असे आहे. डॉ.अमित माने यांनी गॅस सेंन्सर या विषयात अभ्यास करून डॉक्टरेट पदवीचा अभ्यासक्रम पूर्ण करताना १७ शोध निबंध व दहा आंतरराष्ट्रीय कॉन्फरसमध्ये शोध निंबध सादर केले. संशोधनातून विकसित केलेल्या उपकरणामुळे वातावरणातील विषारी वायूंचे प्रमाण समजणार आहे. यामुळे ओद्योगिक क्षेत्रातील उत्पादन प्रक्रियेतील विषारी वायूच्या गळतीचा धोका या उपकरणामुळे लक्षात येणार आहे. या संशोधनामुळे भोपाळ वायू गळती दुर्घटना सारखे धोके टाळता येऊ शकतील. सदर संशोधनात त्यांना सोलापूर विद्यापीठाचे प्रा. डॉ. व्ही. बी. पाटील यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले. डॉ. माने यांच्या यशाबद्दल विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, संस्थेचे सचिव श्री. जयंत कयाल, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश म. चिंचोलकर व महाविद्यालयाच्या विविध विभागांचे विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी शुभेच्छा दिल्या.

दिनांक २३ जुलै २०१७ रोजी गुहागर तालुक्यातील कुणबी समाजाने मेळाव्याचे आयोजन केले होते. या मेळाव्यात जि. प. सभापती, जि. प. सदस्य उपस्थित होते. या कार्यक्रमास महाविद्यालयाची माहिती देण्यासाठी इन्स्ट्रुमेंटेशन विभागाचे विभागप्रमुख प्रा. अविनाश पवार आणि इलेक्ट्रॉनिक व टेलीकम्युनिकेशन विभागाचे प्रा. श्री. दीपक डांगे हे यावेळी उपस्थित होते. तालुक्याची मध्यवर्ती बाजारपेठ असणाऱ्या शृंगारतळी गुहागर बाजार भवन येथे संपन्न झालेल्या कार्यक्रमात तीनशेहून अधिक विद्यार्थी व पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. कार्यक्रमात विविध महाविद्यालयांच्या प्रथम येणाऱ्या विद्यार्थांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात प्रा. श्री. अविनाश पवार यांनी महाविद्यालयातील शैक्षणिक सुविधा, विविध संस्था बरोबर झालेले सामंज्यस करार, ओ. बी. सी. या प्रवर्गासाठी असणाऱ्या शैक्षणिक शिष्यवृत्त्या, अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रवेश प्रक्रिया याविषयीची माहिती उपस्थितांना सांगितली.

महाविद्यालयात प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थांसाठी दिनांक २४ जुलै ते २८ जुलै २०१७ या कालावधीत ब्रीज कोर्स घेण्यात आला. अभियांत्रिकी अभ्यासक्रमात आवश्यक असलेल्या मूलभूत संकल्पना विद्यार्थांना कळाव्या तसेच अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील विषय व विज्ञान शाखेतील विषय यांचा समन्वय व्हावा आणि विद्यार्थिनी अभियांत्रिकी अभ्यासक्रमास सक्षमपणे तयार व्हावे यासाठी ह्या ब्रीज कोर्सचे आयोजन करण्यात आले होते.

दिनांक २८ जुलै ते २९ जुलै २०१७ या कालावधीत महाविद्यालयास भाभा परमाणु अनुसंधान केंद्र, नवी मुंबईच्या १७ ज्येष्ठ माजी शास्त्रज्ञांनी भेट दिली. या कालावधीत त्यांनी प्राध्यापक व विद्यार्थी यांना विविध विषयावर मार्गदर्शन केले. यामध्ये डॉ.नरेंद्र गोळे, श्री. दीपक कानिटकर, डॉ. सुधाकर आगरकर, श्री. अरुण पंडित, श्री. अनिल लोंढे, डॉ. जयंती कुलकर्णी, श्री. किरण दीक्षित, श्री. रमेश जकाती, श्री. मुकुंद दर्भे या शास्त्रज्ञांनी मार्गदशन केले. त्यापैकी डॉ. सुधाकर आगरकर, डॉ. जयंती कुलकर्णी व महाविद्यालयाचे प्रा. डॉ. अमित माने यांनी तालुक्यातील विविध विज्ञान शाखेच्या कनिष्ठ महाविद्यालयांना भेटी दिल्या व तेथील विद्यार्थांना मार्गदर्शन केले. ग्रामीण भागातील विद्यार्थांमध्ये विज्ञानाची व त्यानुषंगाने

---

आत्महत्या हा खुनाचा सर्वात वाईट प्रकार आहे; कारण तेथे पश्चात्तापाला वावच नाही. – सी. कॉलिन्स

अभियांत्रिकी क्षेत्राची गोडी वाढावी यासाठी या भेटीचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थांना शास्त्रज्ञांचे काम, संशोधन कसे असते याची माहिती देण्यात आली.

या भेटीत ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. सुधाकर आगरकर यांनी 'वेळेचे व्यवस्थापन' या विषयावर मार्गदर्शन करताना शैक्षणिक जीवनात वेळेचे व्यवस्थापन किती गरजेचे आहे याचे महत्त्व विज्ञानातील विविध शास्त्रज्ञांच्या चरित्रावरून विशद केले. डॉ. जयंती कुलकर्णी यांनी 'किरणोत्सार' या विषयावर मार्गदर्शन केले. भाभा अणुसंशोधन केंद्र, नवी मुंबई येथील विविध प्रयोगशाळा व त्याचे कामकाज कसे चालते तसेच त्यांनी घेतलेले विविध अनुभव याविषयी माहिती दिली.

या विविध कार्यक्रमास आर. सी. काळे कनिष्ठ महाविद्यालय, पेढे परशुराम चिपळूण या महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. विनायक माळी, युनायटेड कनिष्ठ महाविद्यालय, चिपळूण महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. केदार शेंडे तर डी. बी. जे महाविद्यालय, चिपळूण महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. श्याम जोशी, महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वरचे प्रा. डॉ. अमित माने तसेच विविध महाविद्यालयाचे शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होता.

या दोन दिवशीय भेटीस आलेल्या इतर ज्येष्ठ माजी शास्त्रज्ञांनी महाविद्यालयातील विविध विभागांतील बी. ईच्या विद्यार्थांना संबंधित प्रकल्पावर मार्गदर्शन केले. तसेच तो प्रकल्प अधिक दर्जेदार होण्यासाठी सूचना मांडल्या व प्रकल्प लेखन या विषयावर देखील मार्गदर्शन केले. त्याचप्रकारे जीएसटी व परदेश आयात - निर्यात या विषयावर माजी शास्त्रज्ञ श्री. अजित वोरा यांनी मार्गदर्शन केले. जीएसटी या कर संकल्पनेविषयी माहिती व त्यासंबंधीचे गैरसमज यावर त्यांनी प्रकाश टाकला. श्री. दीपक कानिटकर यांनी व्यावसायिक व नोकरीतील करिअर संधी या विषयावर उपस्थित विद्यार्थी व प्राध्यापकांना सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी केवळ अभियांत्रिकी शिक्षणाशी निगडित नोकऱ्या करण्यापेक्षा उत्पादन विक्रीशी संबंधित नोकऱ्या करण्याकडे विद्यार्थ्यांनी अभिरुची वाढवावी असे सांगितले. तर स्थापत्य अभियांत्रिकी मधील विद्यार्थ्यांना बांधकामातील पाण्याची गळती व त्यावरील उपाय याविषयावर प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले.

त्याचप्रमाणे महाविद्यालयातील मेकॅनिकल अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थ्यांना श्री. अरुण पंडित यांनी धातू ओतकाम यावर मार्गदर्शन केले. यामधील जुन्या पद्धतीचे तोटे लक्षात घेता सतत ओतकाम पद्धतीचे नानाविविध फायदे त्यांनी दृकश्राव्य माध्यमातून उपस्थितांपर्यंत सहज सोप्या भाषेत सांगितले. स्थापत्य अभियांत्रिकी विद्यार्थांना श्री. अनिल लोंढे यांनी जिओटेक्निकल याविषयी मार्गदर्शन केले. श्री. गिरीश कर्नाड यांनी थ्रीडी प्रिंटिंग या विषयावर भाष्य केले. तसेच भाभा अणुसंशोधन केंद्रातील ज्येष्ठ माजी शास्त्रज्ञ डॉ. नरेंद्र गोळे यांनी छंदशास्त्र या विषयावर उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. मराठी भाषेतील काव्यशास्त्राचा विकास व त्या काव्यासाठी वापरले जाणारे विविध जातीवृत्त, मात्रावृत्त याविषयी मार्गदर्शन केले.

या विविध कार्यक्रमास महाविद्यालयाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, संस्थेचे सेक्रेटरी श्री. जयंत कयाल, प्राचार्य डॉ. अविनाश चिंचोलकर व सर्व विभागांचे विभागप्रमुख, शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (AICTE) ने सूचित केल्याप्रमाणे प्रथम वर्ष अभियांत्रिकीमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थांसाठी दिनांक ३१ जुलै २०१७ ते दिनांक २ ऑगस्ट २०१७ या कालावधीत Induction

Programme या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मार्गदर्शनाप्रमाणे या कार्यक्रमास विद्यार्थ्यांसाठी शारीरिक खेळ, कला व समाजभिमुख कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

दिनांक ३१ जुलै २०१७ रोजी महाविद्यालयाच्या स्थापत्य अभियांत्रिकी विभागास भाभा परमाणु अनुसंधान केंद्र, नवी मुंबई (BARC) चे ज्येष्ठ माजी शास्त्रज्ञ श्री. लोंढे यांनी तृतीय व अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी Basics of Geotechnical Engineering and ground improvement या विषयावर मार्गदर्शन केले. त्याच दिवशी माजी शास्त्रज्ञ श्री. कानिटकर यांनी Advanced techniques in water proofing technology या विषयावर मार्गदर्शन केले. श्री. कानिटकर यांनी महाविद्यालयाच्या वसतीगृहातील ज्ञानेश्वरी २ या इमारतीत जाऊन Moisture meter instrument च्या सहाय्याने भिंतीमधील आद्रतेचे प्रमाण कसे मोजतात याचे प्रात्यक्षिक करून दाखविले.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी त्यांच्यातील सुप्त कलागुणांना वाव मिळावा, त्यांचे संप्रेक्षण कौशल्य सुधारावे, त्यांच्या अभिव्यक्ती कौशल्यात सुधारणा व्हावी, त्यांचा भाषिक विकास व्हावा हे सर्व उद्देश साध्य करण्यासाठी महाविद्यालयाने दिनांक ०५ ऑगस्ट २०१७ रोजी वाङ्मय मंडळाची स्थापना केली. महाविद्यालयातील प्रथम वर्षातील प्रा. गणेश दिवे व ग्रंथपाल श्री. संतोष चतुर्भूज यांनी या मंडळाचे कामकाज पाहावे असे ठरले. या वाङ्मय मंडळात प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागातून प्रा. औदुंबर पाटकर, विद्युत अभियांत्रिकी विभागातून प्रा. प्रीती साठे व प्रा. रमादेवी रुद्रा, इलेक्ट्रॉनिक व टेलीकम्युनिकेशन विभागातून प्रा. दीपक डांगे, संगणक विभागाचे प्रा. निखिल गोखले, इन्स्ट्रुमेंटेशन विभागातून प्रा. नाजुका जगताप हे सदस्य म्हणून या मंडळाचे काम पाहणार असे ठरले.

दिनांक ०५ ऑगस्ट २०१७ रोजी या वाङ्मय मंडळाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले व त्याच दिवशी वादविवाद स्पर्धेचे देखील आयोजन करण्यात आले. ही वादविवाद स्पर्धा मराठी, हिंदी, इंग्रजी या तीन भाषांमध्ये होती. मराठी भाषेतून सुयोग दळवी व इंग्रजी भाषेतून हर्षल लवांडे आणि हिंदी भाषेतून आकाश नार्वेकर यांच्या प्रत्येकी संयुक्त गटांनी प्रथम पारितोषिक पटकावले.

महाविद्यालयाने दिनांक ५ ऑगस्ट २०१७ रोजी 'वक्तृत्व कौशल्य विकास' या विषयावर माखजन पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ, माखजन संचालित ॲड पी. आर. नामजोशी कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, माखजन या ठिकाणी प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. माखजन शिक्षण मंडळाचे शैक्षणिक वर्ष २०१७ - १८ हे शतक महोत्सव वर्ष म्हणून साजरे केले जात आहे. याचे औचित्य साधून या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेमध्ये बारावी विज्ञान वर्गातील ७५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर येथील प्रा. गणेश दिवे यांनी प्रशिक्षक म्हणून कार्य केले. आजच्या स्पर्धेच्या युगामध्ये वक्तृत्व कौशल्याची गरज व फायदे, कोणत्याही क्षेत्रात वक्तृत्व कौशल्याची भासणारी गरज आणि वक्तृत्व कौशल्याचे विविध पैलू यांची माहिती त्यांनी विद्यार्थ्यांना दिली. या कार्यशाळेमध्ये प्रशिक्षक प्रा. गणेश दिवे यांनी सुरुवातीला मनोरंजनात्मक खेळ घेऊन प्रथम विद्यार्थ्यांशी जुळवून घेतले. विद्यार्थ्यांना तणावमुक्त केले, यामुळे संपूर्ण कार्यशाळेत विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

विद्यार्थ्यांमधील व्यासपीठावरील भीती घालविण्यासाठी विचारशक्ती व कल्पनाशक्ती वाढविणारे मनोरंजनात्मक विषय देऊन त्यावर विद्यार्थ्यांना एक मिनिटाचे भाषण करण्याची संधी दिली. विद्यार्थ्यांनी फार सुंदर कल्पना

तुम्हाला दुःख सहन करावे लागले तर तुम्ही समजा की, तुम्ही जिवंत आहात! - ओविड

आपल्या भाषणामधून मांडल्या. यानंतर प्रभावी वक्तृत्व कौशल्याच्या तंत्राबाबत चर्चा करण्यात आली. यामधील प्रेषक व व्यासपीठाचा अभ्यास, विषय ज्ञान, आत्मविश्वास, प्रेषकांना मंत्रमुग्ध करण्याचे तंत्र या सारख्या विविध मुद्द्यांवर सखोल चर्चा झाली. एक चांगला वक्ता होण्यासाठी प्रथम चांगला श्रोता असणे गरजेचे आहे व परिपूर्ण सततचा सराव हा वक्तृत्व कौशल्य सुधारण्याचा एकमेव मार्ग असल्याचे प्रा. दिवे म्हणाले. या कार्यशाळेच्या आयोजनामध्ये ना. म. जोशी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. विलास पाटील व प्रा. गौरव पोंक्षे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. तर महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयातील संभाजी लोहार यांनी तंत्रसहाय्य केले.

दिनांक ५ ऑगस्ट २०१७ रोजी महाविद्यालयाने ११ वी व बारावी विज्ञान शाखेच्या विद्यार्थांसाठी कनिष्ठ महाविद्यालय, डेरवण याठिकाणी Home Automation या एकदिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थांना Automation व त्या संबंधित संकल्पनांची माहिती सकाळच्या सत्रात देण्यात आली. Automation साठी आवश्यक असलेली साधने कृती सत्राद्वारे विद्यार्थांकडून तयार करून घेण्यात आली. या कार्यशाळेस ८० विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थांचा अभियांत्रिकी शिक्षणातील कल वाढावा हा या कार्यक्रमामागील उद्देश होता.

दिनांक १२ ऑगस्ट २०१७ रोजी महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी विभागाच्या तृतीय व अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी Proteus ही कार्यशाळा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी प्रकल्पाचे हार्डवेअर तयार करण्याअगोदर सिम्युलेशन सॉफ्टवेअरच्या मदतीने प्रकल्पाचे मिळणारे निष्कर्ष तपासून पाहावे व त्यामुळे विद्यार्थांना तयार करत असलेल्या प्रकल्पाची पूर्ण कल्पना येईल हा या कार्यशाळेचा उद्देश होता. या कार्यशाळेत सिम्युलेशन सॉफ्टवेअरच्या मूलभूत घटकांचे ज्ञान प्रात्यक्षिकाद्वारे व कृती सत्राद्वारे देण्यात आले. IC ५५५ या टाईमरद्वारे विद्युत पुरवठा व लुकलुकणारे एलईडी यांचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. यावेळी प्रा. नेहा आगाशे, प्रा. प्रीती साठे व प्रा. रत्नदीप कीर यांनी विद्यार्थांना मार्गदर्शन केले.

दिनांक १८ ऑगस्ट २०१७ रोजी महाविद्यालयातील यंत्र अभियांत्रिकी विभागामार्फत CATIA -V6 सॉफ्टवेअर यावर एकदिवशीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यंत्र अभियांत्रिकी क्षेत्रातील PLM², Digital Manufacturing, Catia, Dalmia या आधुनिक संगणक आज्ञावलीची माहिति या कार्यशाळेत देण्यात आली. सी. एस. एम, पुणे या कंपनीचे श्री. संदेश कुलकर्णी व श्री. आकाश कोरडे हे या कार्यशाळेसाठी मार्गदर्शक म्हणून लाभले होते. या कार्यशाळेसाठी तृतीय व अंतिम वर्षातील एकूण १२२ विद्यार्थांनी सहभाग घेतला होता.

महाविद्यालयामध्ये दिनांक २० ऑगस्ट २०१७ रोजी विज्ञान शाखेतील विद्यार्थांच्या विकासासाठी खुल्या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या चर्चासत्रासाठी रत्नागिरी जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्यांना निमंत्रित केले होते. या कार्यशाळेत वीसहून अधिक प्राचार्यांनी आपली उपस्थिती नोंदवली.

या चर्चासत्रात रत्नागिरी जिल्ह्यातील शासकीय शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. नाईक यांनी 'कनिष्ठ महाविद्यालयासाठीचे शैक्षणिक उपक्रम' या विषयावर मार्गदर्शन केले. संगणकाधारित शैक्षणिक उपक्रम व त्यासाठीचे शासकीय धोरण तसेच शैक्षणिक नियोजन व अभ्यासक्रम या विषयावर त्यांनी आपले विचार व्यक्त केले. रत्नागिरी शहरातील गोगटे जोगळेकर कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुखटणकर यांनी उपस्थित प्राचार्यांना कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थांसाठीच्या भविष्यातील संधी या विषयावर मार्गदर्शन केले. चांगले अभियांत्रिक, डॉक्टर तयार करण्याची जबाबदारी ही कनिष्ठ महाविद्यालायाचीच

आहे. केवळ चांगला निकाल लागण्यापेक्षा कोकणातील किती विद्यार्थी व्यावसायिक शिक्षणात खरे उतरतात याचा विचार कनिष्ठ महाविद्यालयांनी घेतला पाहिजे असे प्रतिपादन त्यांनी आपल्या मार्गदर्शनात मांडले. यावेळी त्यांनी विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांची व त्याच्या सलंग्न असलेल्या संस्थांची माहिती सांगितली. खुल्या चर्चासत्रात सहभागी झालेल्या अनेक प्राचार्यांना अभियांत्रिकी महाविद्यालयाकडून मानवी संसाधन व इतर शैक्षणिक बाबींच्या आदानप्रदानाची सूचना मांडली. तसेच कोकणातील विद्यार्थांसाठी JEE किंवा MHT-CET सारख्या प्रवेश परीक्षेच्या मार्गदर्शनासाठी सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली. हे चर्चासत्र म्हणजे मूलभूत शिक्षण व व्यावसायिक शिक्षण यातील दरी भरून काढणारे आहे असे प्रतिपादन काही उपस्थित प्राचार्यांनी केले.

यावेळी महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश चिंचोलकर हे अध्यक्षस्थानी होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात अभियांत्रिकी शिक्षणातील संधी, महाविद्यालयाकडून विद्यार्थ्यांसाठी घेतले जाणारे उपक्रम, महाविद्यालयाचा कोकणातील विद्यार्थ्यांकडे पाहण्याचा दृष्टीकोन व गुणवत्ता शिक्षणासाठीचे प्रयत्न यावेळी नमूद केले. तर महाविद्यालयाचे प्रथम वर्ष विभागाचे विभागप्रमुख डॉ. अमित माने यांनी प्रास्ताविक केले. तसेच भाभा परमाणु अनुसंधान केंद्र, नवी मुंबई मधील ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रंगनाथ सराफ हे यावेळी उपस्थित होते.

दिनांक ०८ सप्टेंबर २०१७ रोजी भाभा परमाणु अनुसंधान केंद्र, नवी मुंबई (B-RC) च्या ज्येष्ठ माजी शास्त्रज्ञ श्री. लोंढे यांनी Water transportation, Dock and harbor या विषयावर मार्गदर्शन केले.

दिनांक ०९ सप्टेंबर २०१७ रोजी महाविद्यालयाच्या वाङ्मय मंडळाद्वारे Poetry Recitation and Explanation Competition चे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना काव्य वाचन करता यावे तसेच भाषेचा/ काव्याचा भावार्थ व लक्ष्यार्थ विद्यार्थ्यांना आपल्या शब्दात मांडता यावा यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा मराठी, हिंदी, इंग्रजी अशा तीनही भाषांमध्ये झाली. या स्पर्धेत मराठी भाषेतून संगणक अभियांत्रिकी विभागाची कु. स्मृती चव्हाण आणि हिंदी व इंग्रजी भाषेतून स्थापत्य अभियांत्रिकी विभागाचा कु. आकाश नार्वेकर यांनी प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले.

दिनांक ०९ सप्टेंबर २०१७ रोजी महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी विभागाच्या तृतीय व अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी Proteus Software च्या सहाय्याने पीसीबी डिझाईन करण्यासंबंधी कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेतील विद्यार्थ्यांना इलेक्ट्रिकल विभागाचे विभागप्रमुख प्रा. सतीश घोरपडे व प्रा. योगेश काटदरे यांनी मार्गदर्शन केले.

दिनांक १५ सप्टेंबर २०१७ रोजी महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी विभागातील द्वितीय वर्षातील विद्यार्थांनी जे. एस. डब्ल्यू, जयगड या विद्युत निर्मिती करणाऱ्या प्रकल्पास भेट दिली. या औद्योगिक भेटीत ३१ विद्यार्थांनी व तीन प्राध्यापकांनी सहभाग घेतला. या स्थळ भेटीमुळे विद्यार्थांना Thermal Power Plant, Switch Yard, Generator Section व कंट्रोल रूमचे कार्यप्रणाली प्रत्यक्ष जवळून पाहता आली.

दिनांक १५ सप्टेंबर २०१७ रोजी 'अभियांत्रिकी दिना' चे औचित्य साधून महाविद्यालयाचे विद्युत अभियांत्रिकी विभागाचे विभागप्रमुख प्रा. श्री. सतीश घोरपडे व प्रा. श्री. योगेश काटदरे यांनी महाराष्ट्र पॉलिटेक्निक, मंडणगड येथे भेट दिली. या प्रसंगी अभियांत्रिकी शिक्षणातील विविध संधी, पदवी

अभ्यासक्रमाचे फायदे व थेट द्वितीय वर्षात प्रवेश घेण्यासंबंधी मार्गदर्शन केले.

दिनांक १६ सप्टेंबर २०१७ रोजी महाविद्यालयाद्वारे आर. सी. काळे कनिष्ठ महाविद्यालय, पेढे परशुराम, चिपळूण आणि न्यू इंग्लिश स्कूल कनिष्ठ महाविद्यालय, पाटपन्हाळे या दोन ठिकाणी JEE (जेईई)/ MHT-CET (एमएचटी-सीईटी) या प्रशिक्षण कार्यशाळेचे उदघाटन करण्यात आले. बारावी विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना अभियांत्रिकीसाठी आवश्यक असलेल्या प्रवेश प्रक्रियेमध्ये चांगले यश मिळावे यासाठी दिनांक १६ डिसेंबर २०१७ पासून ते दिनांक ३ एप्रिल २०१८ पर्यंत प्रत्येक शनिवार व रविवारी प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या दोन्ही केंद्राचे मिळून बारावी विज्ञान शाखेचे १०० विद्यार्थी लाभ घेत आहेत.

दिनांक १९ सप्टेंबर ते २१ सप्टेंबर २०१७ या कालावधीत महाविद्यालयातील यंत्र अभियांत्रिकी विद्यार्थांसाठी भारती शिपयार्ड, उसगाव (दापोली) या कंपनीचे माजी अध्यक्ष श्री. सुभाष दीक्षित यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. दिनांक १९ सप्टेंबरला तृतीय वर्षाचे ७० विद्यार्थी या व्याख्यानास उपस्थित होते. श्री. दीक्षित यांनी सीएनसी मशीन संबंधित माहिती सांगितली. तर दिनांक २० सप्टेंबर २०१७ रोजी अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना ऊर्जा संवर्धन आणि मुलाखतीस आवश्यक असणारे तंत्र या विषयावर मार्गदर्शन केले. तर दिनांक २१ सप्टेंबर २०१७ रोजी 'प्रकल्पाची निवड' या विषयावर उपस्थित १२५ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दिनांक २२ सप्टेंबर २०१७ रोजी आर. एस. सी. ओ. इ. पेढांबे महाविद्यालय येथे महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयाने पीसीबी डिझाईन या विषयावर कार्यशाळा घेतली. या कार्यशाळेस पेढांबे महाविद्यालयातील पदवी व पदविका या अभ्यासक्रमाचे विद्यार्थी उपस्थित होते. महाविद्यालयातून इलेक्ट्रिकल विभागाचे विभागप्रमुख प्रा. सतीश घोरपडे व प्रा. योगेश काटदरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दिनांक २३ सप्टेंबर २०१७ रोजी महाराष्ट्र पॉलीटेक्निक, मंडणगड येथील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या विद्युत अभियांत्रिकी विभागास भेट दिली. विद्युत अभियांत्रिकीच्या विविध प्रयोगशाळा व विद्यार्थ्यांनी तयार केलेले प्रकल्प उपस्थित विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले.

दिनांक २६ सप्टेंबर २०१७ रोजी महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थ्यांना Nuclear Fission : Basic Concepts and its application for electrical power generation in India या विषयावर भाभा परमाणु अनुसंधान केंद्र, नवी मुंबई (बी. ए. आर. सी) चे माजी शास्त्रज्ञ डॉ. बी. एस. व्ही. जी. शर्मा यांनी व्याख्यान दिले. तर दिनांक २८ सप्टेंबर २०१७ रोजी माजी शास्त्रज्ञ डॉ. बी. एस. व्ही. जी. शर्मा आणि श्री. कर्नाड यांनी विद्यार्थ्यांना प्रकल्पाविषयी मार्गदर्शन केले.

मुंबई विद्यापीठाच्या अभ्यासक्रमानुसार अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना औद्योगिक स्थळ भेटी आवश्यक आहे. या अभ्यासक्रमाचा भाग म्हणून महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी विभागातील अंतिम वर्षाच्या ३० विद्यार्थ्यांनी दिनांक २६ सप्टेंबर २०१७ रोजी अहमदाबाद येथील इस्त्रो या संस्थेस भेट दिली. या भेटीत विद्यार्थ्यांना पीसीबी डिझाईन प्रयोगशाळा, पीसीबी टेस्टिंग प्रयोगशाळा, सॅटेलाईट व्हॅब्रेषण टेस्टिंग प्रयोगशाळा, अॅन्टेना टेस्टिंग प्रयोगशाळा या इस्त्रोच्या विविध प्रयोगशाळांना भेट देऊन माहिती घेण्यात आली.

दिनांक २७ सप्टेंबर २०१७ रोजी विद्युत अभियांत्रिकी विभागातील अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी वीरमाता जिजाबाई टेक्निकल इन्स्टिट्यूट (VJTI), मुंबई या महाविद्यालयास भेट दिली. मुंबई विद्यापीठाच्या

अभ्यासक्रमानुसार सातव्या सत्रामध्ये High Voltage Transmission या विषयासाठी आवश्यक असलेल्या प्रयोगशाळेस विद्यार्थ्यांनी भेट दिली. या प्रयोगशाळेत विद्यार्थ्यांनी MARX Impulse Generator, CW voltage multiplier circuit या प्रयोगांचे प्रात्यक्षिक केले. यावेळी महाविद्यालयातील ३० विद्यार्थ्यांनी या भेटीस सहभाग घेतला.

दिनांक २८ सप्टेंबर २०१७ रोजी भाभा परमाणु अनुसंधान केंद्र, नवी मुंबईचे ज्येष्ठ माजी शास्त्रज्ञ डॉ. बी. एस. व्ही. जी. शर्मा व श्री. कर्नाड यांनी महाविद्यालयाच्या विद्युत अभियांत्रिकी विभागातील तृतीय व अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना प्रकल्प मार्गदर्शन केले.

दिनांक २८ व २९ सप्टेंबर २०१७ रोजी महाविद्यालयातील इन्स्ट्रुमेंटेशन अभियांत्रिकी विभागाने आय. ओ. पी. ई, लोणेरे येथे MATALAB आणि Proteus या संगणक आज्ञावलीवर कार्यशाळा घेण्यात आली. महाविद्यालयाच्या या विभागाचे प्रा. सुरजकुमार सवाई व प्रा. नाजुका जगताप यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत इन्स्ट्रुमेंटेशन, इलेक्ट्रॉनिक्स व टेलीकम्युनिकेशन, इलेक्ट्रीकल आणि माहिती तंत्रज्ञान विभागातील एकूण १०५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

दिनांक ०५ ऑक्टोबर २०१७ रोजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने स्वयंसेवकांमध्ये सामाजिक जाणीव, सर्वांगीण विकास व राष्ट्रीय आत्मीयता घडवून आणण्याच्या दृष्टीने 'राष्ट्रीय सेवा योजना' दिन साजरा केला. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना युनिट मधील विद्यार्थी व प्रथम वर्ष विभागाचे विद्यार्थी यांचा यामध्ये समावेश होता. महाविद्यालय, ग्रामपंचायत वेळणेश्वर व महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर यशस्वी संपन्न झाले. जर कोकणातील समुद्र किनाऱ्यांचे प्रदूषण असेच वाढत राहिले तर त्यामुळे स्थानिकांच्या व पर्यटकांच्या आरोग्यास धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे शासनाबरोबरच एक सामाजिक बांधिलकी म्हणून प्रत्येक नागरिकाने हे समुद्र किनारे प्रदूषण विरहीत ठेवण्यासाठी आपला खारीचा वाटा उचलणे गरजेचे आहे. ही शिकवण राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत घेण्यात आलेल्या ह्या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना देण्यात आली. ह्या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयातील १५० विद्यार्थ्यांचा व सात प्राध्यापकांचा समावेश होता. या उपक्रमात समुद्र किनाऱ्यालगतचा सुमारे ५० टन इतका कचरा काढण्यात आला.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे प्रमुख व महाविद्यालयाचे प्रथम वर्ष विभागाचे प्रा. औदुंबर पाटकर व इलेक्ट्रॉनिक व टेलीकम्युनिकेशन विभागाचे प्रा.विनोद साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वी पार पडला. यावेळी महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश चिंचोळकर, महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डचे अधिकारी श्री. परदेशी सर, श्री. रामदास नाटेकर, सरपंच श्री. नवनीत ठाकूर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

दिनांक ०६ ऑक्टोबर २०१७ रोजी एस. एस. ओ. एस. पी., नागोठणे येथील पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी विभागास भेट दिली. या भेटीत महाविद्यालयातील प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना प्रोटेक्शन आणि स्वीचगिअर, विद्युत यंत्र तसेच मागील वर्षाच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेले प्रकल्प याविषयी माहिती देण्यात आली. या भेटीत ६० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

मुंबई विद्यापीठामार्फत घेण्यात आलेल्या अभियांत्रिकीच्या शेवटच्या वर्षाच्या बी. ई. च्या निकालात महाविद्यालयाच्या सर्व विभागांचा एकत्रित निकाल ९२ टक्के इतका लागला आहे. यामध्ये

महाविद्यालयातील कॉम्प्युटर विभाग, इलेक्ट्रॉनिक्स अँण्ड टेलिकम्युनिकेशन विभाग, इलेक्ट्रिकल विभाग, इन्स्ट्रुमेंटेशन विभाग, स्थापत्य विभाग आणि मेकॅनिकल विभाग या विभागांमधून एकूण २०९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थांपैकी ८३ विद्यार्थ्यांचा निकाल हा प्रथमश्रेणी व त्याहून अधिक आहे. म्हणजे परीक्षेस बसलेल्या एकूण विद्यार्थांच्या ४२ टक्के हून अधिक विद्यार्थी प्रथम श्रेणी व विशेष प्रावीण्य श्रेणीतून उत्तीर्ण झाले आहे.

महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयात कॉम्प्युटर विभागातून सुहेब घारे (८.२३), इलेक्ट्रिकल विभागातून कल्याणी तोंडलेकर (८.४१), इलेक्ट्रॉनिक्स अँण्ड टेलिकम्युनिकेशन विभागातून वर्षा नांबियार (७.९), इंस्ट्रुमेंटेशन विभागातून अनिकेत दळवी (७.२१) व मेकॅनिकल विभागातून अजिंक्य पटवर्धन (८.९७) आणि स्थापत्य विभागातील अभिषेक पांड्चे (८.५१) हे विद्यार्थी प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. या सर्व विभागातून मेकॅनिकल विभागाचा अजिंक्य पटवर्धन हा विद्यार्थी महाविद्यालयात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला.

सर्व यशस्वी विद्यार्थांचे विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर व संस्थेचे सर्व मान्यवर, महर्षी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश म. चिंचोळकर तसेच विद्या प्रसारक मंडळ संचलित कौन्सिल ऑफ सिनिअर सायंटिस्टच्या सर्व सदस्यांनी व शिक्षक वर्गाने विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

दिनांक ०५ ऑक्टोबर २०१७ रोजी महाविद्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रीय स्वेच्छा रक्तदान दिवस आणि महात्मा गांधी जयंतीनिमित्त महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर व शासकीय रक्तपेढी, रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केले होते. या रक्तदान शिबिरात महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर आणि विद्यार्थी यांनी सक्रीय सहभाग नोंदविला. यावेळी १०० जणांनी या रक्तदान शिबिरामध्ये रक्तदान केले. शिबिरात शंभर रक्ताच्या बाटल्यांचे संकलन करण्यात आले. एक सामाजिक बांधिलकी म्हणून महाविद्यालयाने सलग चौथ्या वर्षी रक्तदान शिबिराचे यशस्वीरित्या आयोजन केले. यावेळी सहभागी झालेल्या सर्व रक्तदात्यांना सामाईक स्वेच्छिक रक्तदान प्रमाणपत्र देण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत करण्यात आले. या विभागाच्या विद्यार्थ्यांनी हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रचंड मेहनत घेतली. या कार्यक्रमाचे समन्वयक महाविद्यालयातील स्थापत्य विभागाच्या प्रा. कोमल शिंदे, इलेक्ट्रॉनिक्स व टेलीकम्युनिकेशन विभागाचे प्रा. विनोद साळुंखे, प्रथम वर्ष विभागाचे प्रा. औदुंबर पाटकर हे होते.

दिनांक १३ ऑक्टोबर २०१७ रोजी महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी विभागाच्या तृतीय वर्षातील ४२ विद्यार्थ्यांनी बंगलोर येथील इस्त्रो या संस्थेत भेट दिली. या भेटीत विद्यार्थ्यांना क्लीन रूम, रिमोट सेन्सिंग, सॅटेलाईट मॅन्युफॅक्चीरिंग या विभागांची माहिती उपस्थित विद्यार्थांना देण्यात आली.

मुंबई विद्यापीठाच्या अभ्यासक्रमानुसार स्थापत्य अभियांत्रिकी अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी विविध स्थळ भेटीचे आयोजन करणे आवश्यक आहे. याचाच एक भाग म्हणून दिनांक १३ व १४ ऑक्टोबर २०१७ रोजी महाविद्यालयातील स्थापत्य अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी जायकवाडी धरण, पैठण क्षेत्र येथे भेट दिली. गोदावरी नदीवरील जायकवाडी हे आशिया खंडातील एक मोठे मातीचे धरण आहे. तसेच जायकवाडी धरणावर १२ मेगावॅट Hydroelectric power plant आहे. या सर्वांची कार्यपद्धती व रचना यावेळी विद्यार्थ्यांना अभ्यासता आली.

दिनांक १६ ऑक्टोबर २०१७ रोजी महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी विभागाने तारापूर येथील अणू ऊर्जा प्रकल्पास भेट दिली. या विभागातील ६० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. या भेटीत विद्यार्थ्यांना अणू विद्युत प्रकल्प, स्वीचयार्ड, जनरेटर सेक्शन व कंट्रोल रूम या विभागांच्या कार्यपद्धतीची माहिती देण्यात आली.

दिनांक १७ ऑक्टोबर २०१७ रोजी महाविद्यालयातील स्थापत्य अभियांत्रिकी विभागातील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी दासावे लवासा सिटी, पुणे येथे क्षेत्र भेट देण्यात आली. अभ्यासक्रमातील पर्यावरण अभियांत्रिकी या विषयासाठी ही भेट आवश्यक होती. या भेटीदरम्यान लवासा सिटी, पुणे येथील सांडपाणी प्रक्रिया सयंत्र याचा अभ्यास यावेळी करण्यात आला. यामुळे विद्यार्थ्यांना सांडपाण्याचे व्यवस्थापन प्रक्रिया करून ते बांधकामासाठी व बागकामासाठी कसे वापरले जाते याचे प्रात्यक्षिक पाहता आले. याचबरोबर लवासा शहराचे नगर नियोजन, देसावे नदीवरील धरणाची रचना याविषयी अभ्यास करता आला.

दिनांक १८ ऑक्टोबर ते २२ ऑक्टोबर २०१७ या चार दिवशीय ब्राझील मध्ये झालेल्या MOSTRATEC 2017 या आंतरराष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनात विद्या प्रसारक मंडळाचे महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर हे भारतातील एकमेव महाविद्यालय होते. महाविद्यालयातील साहील कदम व ऋषिकेश भावे या दोन विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रकल्पास विशेष मानांकनाचा प्रकल्प म्हणून पुरस्कार मिळाला.

ब्राझील मधील न्यू हँब्रग्रो येथील Fundacao Liberat ही एक नामांकित आंतरराष्ट्रीय विज्ञान प्रदर्शन करणारी संस्था आहे. ही एक नामांकित शैक्षणिक संस्था आहे. या संस्थेअंतर्गत गेल्या ३२ वर्षांपासून MOSTRATEC या नावाने आंतरराष्ट्रीय विज्ञान प्रदर्शन भरविले जाते. MOSTRATEC 201 या विज्ञान प्रदर्शनात दक्षिण आफ्रिका, वेस्टइंडिज, ऑस्ट्रेलिया, कझाकिस्तान, अर्जेंटिना, पेरू, जर्मनी अशा वीस देशांचे मिळून सातशेहून अधिक प्रकल्प प्रदर्शित करण्यात आले होते. हे आंतरराष्ट्रीय विज्ञान प्रदर्शन विविध स्तरावर आयोजित करण्यात आले होते. त्यामध्ये शालेय, पदविका व पदवी या स्तराचा समावेश होता. प्रकल्पाची अचूकता व गुणवैशिष्ट्ये जाणून घेण्यासाठी पाच तज्ज्ञांच्या समितीद्वारे मूल्यमापन करण्यात आले. या समितीत शैक्षणिक व औद्योगिक क्षेत्रातील तज्ज्ञ सभासदांचा समावेश असल्यामुळे मूल्यमापन हे अधिकच काटेकोर होते. अशा स्पर्धेत महाविद्यालयास विशेष मानांकन पुरस्कार मिळणे हे कौतुकास्पद आहे.

या आंतरराष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनात महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयातील या दोन विद्यार्थ्यांनी कृषी क्षेत्राला उपयुक्त ठरणारे ॲग्रीकल्चर वीड रिमूव्हर हे यंत्र तयार केले. भारतात विशेषतः महाराष्ट्रात शेती करताना शेतमजुरांची समस्या ही मोठ्या प्रमाणात भेडसावत असते. त्यामुळे मळणी, कापणी, खुरपणी यासारख्या क्रियांचे यांत्रिकीकरण होणे आवश्यक आहे. ही गरज ओळखून यांत्रिक पद्धतीने बागायती, शेतीमधील वाढलेल्या तणांची कापणी तसेच जमीन भुसभुसीत करणे यासाठी या यंत्राची निर्मिती केली गेली आहे. हे यंत्र पूर्णता महाविद्यालयात बनविण्यात आले असून जवळपासच्या शेतकऱ्यांच्या भातशेतीत त्याचे प्रात्यक्षिक करून पाहण्यात आले होते. या प्रकल्पामुळे निश्चितच शेतीसाठी मानवी संसाधन अत्यंत अल्प प्रमाणात लागणार आहे.

विद्यार्थी दशेतच आंतरराष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनात देशाचे नेतृत्व करण्याचा मान आम्हाला मिळाला याचाच आम्हांला अभिमान वाटतो असे भावोद्गार विद्यार्थ्यांनी या पत्रकार परिषदेवेळी काढले. विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही संस्था सातत्याने विज्ञान व अभियांत्रिकी शाखेच्या विद्यार्थ्यांना अशा आंतरराष्ट्रीय विज्ञान परिषदांसाठी

---

कारागीर अभ्यासाचा तिरस्कार करतात, साधे लोक त्याचे कौतुक करतात आणि शहाणी माणसे त्याचा उपयोग करतात. – बेकॉन

प्रोत्साहन देत असते. गेल्या तीन वर्षांपासून विद्या प्रसारक मंडळ चीनमध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनात देशाचे प्रतिनिधित्व करून पारितोषिक मिळवीत आले आहेत. कोकणातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरी भागातील विद्यार्थ्यांप्रमाणे दर्जात्मक शिक्षण मिळावे, आधुनिक शैक्षणिक साधन सामुग्रीची उपलब्धता ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही व्हावी व त्यातून या विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सिद्ध व्हावे असे स्वप्न पाहून निर्माण केलेल्या महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या या यशामुळे अल्पशा प्रमाणात का होईना ते पूर्ण होत आहे व या पुढेही महाविद्यालयास एका शैक्षणिक उंची पर्यंत नेण्याचा कयास आम्ही बाळगतो असे प्रतिपादन संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी केले. या आंतरराष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनात महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी ते स्वतः विद्यार्थ्यांसोबत ब्राझीलला होते. विद्या प्रसारक मंडळ या संस्थेअंतगर्त चालणाऱ्या आंतरराष्ट्रीय शिक्षण आणि संशोधन समितीचे प्रमुख डॉ. सुधाकर आगरकर यांनी प्रकल्पाच्या यशस्वीतेसाठी विद्यार्थ्यांना सर्व स्तरावर समुपदेशन केले.

या प्रकल्पाचे मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयाच्या मेकॅनिकल विभागाचे विभागप्रमुख प्रा.बाळागौडा पाटील व प्रा.आनंद पतंगे यांनी काम पाहिले. विद्यार्थ्यांनी अतिशय कमी वेळात हा प्रकल्प पूर्ण करून महाविद्यालयाचे नाव सार्थ केले असे प्रतिपादन त्यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश म. चिंचोळकर यांनी प्रकल्प निवडीपासून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन व मार्गदर्शन केले. या पत्रकार परिषदेत त्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून येणाऱ्या काळात महाविद्यालय अशा आंतरराष्ट्रीय प्रदर्शन, परिषद, कार्यशाळा यामध्ये भाग घेऊन महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा अधिकाधिक उंचावण्याचा प्रयत्न करील असे आश्वासन दिले. महाविद्यालयाचे प्रकल्प प्रमुख ऋषीकेश गोखले यांनी विद्यार्थ्यांना पासपोर्ट, व्हिजा व इतर तांत्रिक घटकांसंबंधी मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांचे मनोबल सकारात्मक ठेवण्यासाठी प्रयत्न केले. या प्रकल्पासाठी महाविद्यालयातील कार्यशाळा सहाय्यक हिमांशू सावंत, संजीव ढेपसे व चंद्रकांत साळवी यांनी मोलाची मदत केली.

महाविद्यालयातील स्थापत्य अभियांत्रिकी विभागातील तृतीय व अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी 'ऑटोकॅड' या आज्ञावलीची कार्यशाळा संपन्न झाली. विभागाचे प्रयोगशाळा सहाय्यक श्री. चेतन रहाटे यांनी विद्यार्थ्यांना या आज्ञावलीचे प्रशिक्षण दिले. विद्यार्थ्यांचे गट करून या कार्यशाळेचे प्रशिक्षण पूर्ण सत्रात देण्यात आले. ऑटोकॅड ही आज्ञावली स्थापत्य अभियांत्रिकी (वास्तुशास्त्र), आंतरिक नक्षीकाम, बांधकाम उद्योग यामध्ये वापरली जाणारी आज्ञावली आहे. या आज्ञावलीद्वारे विविध बांधकामांची रचना द्विमितीय व त्रिमितीय पद्धतीने संगणकावरती काढता येते. म्हणून 'स्थापत्य अभियांत्रिकी' या अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी या आज्ञावलीचे प्रशिक्षण गरजेचे आहे.

•••

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**- संपादक**

(पृष्ठ क्र. २ वरून - **संपादकीय)**
यांचाच समावेश असतो. 'साहित्य', 'कला', 'संगीत', 'भाषा' यांचा अंतर्भाव आजच्या विज्ञान या संकल्पनेत होतच नाही.

साहजिकच आजच्या विज्ञान शाखांचा विकास हाच, 'राष्ट्र' किंवा 'सभ्यतां'च्या विकासाच्या मोजमापाचं परिमाण होऊन जाते. या सगळ्या दृष्टीने अमेरिका व यूरोपियन राष्ट्रं ही शिखरावरती आहेत. अमेरिका ही या विकासाचा अत्युच्च बिंदू धरला, तर आज कुणीही व्यक्ती उठते व पाचपन्नास लोकांना मारून टाकते, व्यसनाधीनतेचे प्रमाण, किंवा नैसर्गिक साधनसंपत्तीचा वारेमाप अविवेकी वापर, व त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे, बळजबरीने जगातल्या सर्व राष्ट्रांमध्ये त्यांनी कुठली राजकीय प्रणाली निवडायची हे ठरवण्याचा अधिकार ही विकसित, प्रगल्भ समाजाची लक्षणं आहेत का? यामध्ये मानवी नीतिमूल्य, किंवा नात्यागोत्यांतून निर्माण झालेली समाजव्यवस्था याला किंमत शून्य आहे. म्हणजेच 'वस्तुस्थिती' आणि 'सामाजिक', 'सांस्कृतिक' उंची व खोलीचे मोजमाप करण्याची 'परिमाणं' यामध्ये कुठेतरी विरोधाभास निर्माण झालाय.

भारत हा एक प्राचीन देश आहे. साहाजिकच त्याचा सांस्कृतिक व सामाजिक इतिहासाचा कालपटही खूप मोठा आहे. भारतीय सभ्यतेचा आधीचा काळ ही 'बाल्यावस्था' होती. या कोशातून बाहेर आलो तरच त्यातल्या काही सामाजिक व सांस्कृतिक व्यवस्थांचा संदर्भ आपल्याला समजू शकतो. अशोकाचे शिलालेख असोत, किंवा विजयनगर, छत्रपती शिवाजी महाराजांचा कार्यकाळ असो, तसेच त्या काळातील संतांची शिकवण असो, यामध्ये भौगोलिक आणि कालक्रमणांची विविधता असली, तरी जीवन जगण्याची, आणि ते जगवण्याकरता लागणाऱ्या नीतिमूल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात एकवाक्यता होती. 'सर्व मानव एक आहेत', ही 'भोळसट' संकल्पना त्यांना नक्कीच मान्य दिसत नाही. स्त्री पुरुषांमध्येच नाही, तर प्रत्येक वयोगट व नात्यांप्रमाणे सुसंगतता आणण्याकरिता, 'भिन्नता' मान्य करून समाजव्यवस्थेची वीण तेव्हा बांधलेली दिसते. यालाच आपण 'वर्णाश्रम व्यवस्था' म्हणतो.

यामध्ये ब्रह्मचर्य, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम हे प्रत्येक व्यक्तिच्या आयुष्यामध्ये येणारे कालखंड आजही नाकारता येणार नाहीत. त्याचप्रमाणे समाजाच्या दैनंदिन गरजांप्रमाणेही त्यांचं वर्गीकरण केलेले आपण पाहतो. याच व्यवस्थेला आपण व्यापकतेने 'वर्ण'व्यवस्था म्हणतो. प्रत्येक पिढी आपल्या पुढच्या पिढीला वर्ण 'कौशल्य' अधिक विकसित करून संक्रमित करत होती. यातूनच त्यांच्या 'जाणिवा' आणि 'जबाबदाऱ्या' विकसित होत होत्या. आजच्या 'शाळा' या संकल्पनेच्या बाहेरील हे 'कौशल्य' शिक्षण होत. त्यामध्ये विविधता होती.

कुठलीही व्यवस्था १००% परिपूर्ण असूच शकत नाही. वेगवेगळ्या स्तरावरच्या 'विविधता' मान्य केल्यावर त्यामध्ये काही प्रमाणात 'वैगुण्य' आणि 'असमानता' ही येणारच. तशी 'सर्व सुखी' अशी व्यवस्था आधिही केव्हाही नव्हती, आणि भविष्यातही येण्याची शक्यता नाही. या सगळ्या व्यवस्थेमध्ये व्यापकतेने 'विविधता' आणि 'एकता' या दोहोंचेही संतुलन असेल तरच तो समाज विकसित होतो. त्या समाजाचे विज्ञान, साहित्य, स्थापत्य, कला, भाषा ही सगळी अंगे विकसित होतात. या सगळ्या शाखांचा भारतातील विकास, म्हणजेच त्याची संस्कृती ही आज साहित्य, कला, स्थापत्य इ. अनेक अंगानी आज आपल्या समोर संदर्भा करता उभी आहे.

हा समाज मागासलेला, अविकसित होता का? समाजातील सर्व घटक एकमेकांच्या उरावरती बसले आहेत, व वर्गकलहाने पछाडलेले आहेत असा निष्कर्ष यातून निघतो का? आज सगळ्या भारतियांना एकच 'घटना' आहे. या पार्श्वभूमीवरती वर उल्लेख केलेले वाढते अपघात आणि सगळ्या भारतीय समाजाची 'आम्ही मागासलेले आहोत' असे जाहीर करून घेण्याची तीव्र इच्छा हे काय दर्शवते? उठता बसता 'एकता' आणि 'जाती'निर्मूलनाच्या घोषणा, पण जन्मापासून

जातीच्या प्रमाणपत्राचा आग्रह!! जातीनिर्मूलनाचा इतका 'दांभिक' आणि 'हास्यास्पद' कार्यक्रम जगाच्या पाठीवर कुठेही अस्तित्वात नाही.

आपण जेव्हा आईच्या गर्भात असतो, तेव्हापासून आपल्या 'जाणिवा' विकसीत व्हायला लागतात. आईच्या गर्भातील या जाणिवा या सुद्धा तो गर्भ आपल्या अनुभवांतूनच शिकत असतो. प्रत्यक्ष जन्माला आल्यानंतर आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर या जाणिवांची मशागत करायला लागते. जाणिवांची मशागत करण्यासाठी निर्मिलेली व्यवस्था म्हणजेच 'कुटुंब'व्यवस्था. यातूनच निर्माण होतात 'कौटुंबिक' व 'सामाजिक' नातीगोती. या जाणिवांचंच रूपांतर पुढे जबाबदाऱ्यांमध्ये होतं, आणि या जबाबदाऱ्याच शेवटी माणसाचा वैयक्तिक व सामाजिक विकासाशी निगडित असतात.

आजची चार भिंतींमधील शिक्षणव्यवस्था ही माहितीच्या प्रसारणापुरती मर्यादित आहे. यातून 'संवेदनशील' जाणिवा निर्माण होतील याची खात्री नाही. जो प्रकार आजच्या शिक्षणव्यवस्थेचा आहे, तोच 'भ्रम' व 'भाबडी' समजूत आज 'घटना' 'सरकार' किंवा 'पोलीस' या व्यवस्थांबद्दलही आहे. या समाजयंत्राचा सर्वात महत्त्वाचा घटक हा 'मानव' आहे, व तोच जेव्हा 'संवदेनाशून्य', 'जाणिवशून्य' होतो त्यावेळी सरकार, घटना व पोलीस-यंत्रणा कुचकामी असते.

समानता (equality) व एकता (unity) हे समानार्थी शब्द नाहीत. आजची लोकशाही ही 'आकडेशाही' आहे. याच्यामध्ये 'जाणिवा' किंवा 'प्रगल्भते'चे कुठेही प्रतिबिंब नाही. २०% हून अधिक आपले लोकप्रतिनिधी गुन्हेगारी पार्श्वभूमीचे आहेत. बहुतेकांचा स्वतःचा काहीही व्यवसाय नाही, असला तरी तो नावापूरताच. राजकारण हाच यांचा व्यवसाय. या व्यवसायातून त्यांनी निर्माण केलेली 'माय' बघून डोळे दिपून जातात. कुठल्याही प्रामाणिक व्यावसायिकाला करता येणार नाही अशी ही 'माया' असते. 'घराणेशाही' किंवा 'व्यक्तीस्तोम' या दोनच निकषांवर आजचे राजकारण चालते. हीच आपल्या आजच्या लोकशाहीची मोठी आणि खरी शोकांतिका आहे.

आजच्या बहुतेक सगळ्या अपघातांमागे नागरिकाचा 'बेजबाबदारपणा' कारणीभूत आहे. कायदा, घटना, आरक्षण किंवा मागासलेपणाची जाहिरात, व्यक्तींमध्ये जबाबदारीची जाणीव आणू शकत नाही. त्याची मशागत जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर करायला लागते. आज 'विविधतेतील एकता', आणि 'अधिकारां'च्या जंगलामध्ये या 'जाणिवा' व 'जबाबदाऱ्या' इतिहासजमा झाल्या आहेत. आजचे आपले अपघात हे त्याचे दृष्यस्वरूप आहे. आपले सण आणि समारंभांचे जसे आपण राजकीयकरण केलं आहे, तसेच 'विविधतेत एकता', किंवा 'वसुधैव कुटुंबकम्' या घोषवाक्यांना आपण 'संदर्भहीे' आणि 'हास्यास्पद' करून टाकलंय. यामुळे 'विविधता' आणि 'एकता' या दोघांवरही आपण सारखाच अन्याय करतो आहोत. मतपेटीवर डोळा ठेवून समाजातील प्रथांचे किंवा परंपरेचा केलेला अनुनय म्हणजे विविधतेचा आदर नाही. 'भाषा', 'धर्म', 'प्रांतीय' अस्मिता यांचा या करता केलेला वापर हा 'विविधते'ची जपणूक नाही, तर ते 'विघटने'ला दिलेलं निमंत्रणच असते. आपल्या स्वातंत्र्यापासूनच आजपर्यंत असल्या राजकीय खेळखंडोब्याची अनेक उदाहरणे आपल्या समोर आहेत.

आपल्या संस्कृतीला 'विविधता' आणि 'एकता' नवीन नाहीत. त्याच्या सामाजिक व्यवस्थेतच त्याचा अंतरभाव होता. राजकारणाची त्यावर चढवलेली पुटे दूर करा, तेव्हाच दिसेल शतकानुशतकं टिकवलेली 'विविधतेतील एकता'.

**''भीतरी ज्ञान होवावे। मग बाहेर लाभेल स्वभावे।''** (ज्ञानेश्वरी)

**डॉ. विजय बेडेकर**

●●●

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006



# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❈ संपर्क ❈**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.